डॉ. कर्ट कोर्बर. हॅम्बुर्ग. वेस्ट जर्मनी. ५ कोटी सिगारेट बनविण्याच्या यंत्र सामुग्रीचा कारखाना मजूर मालकीचा केला व २,००० कामगारांना मालकी हक्क दिला, हे मी आपल्या २९ मार्चच्या अंकात वाचले.

आपल्या विदर्भात पुसद या गावी श्री. ना. दे. पांढरीपांडे ग्राहकांचे कापड दुकान गेल्या १९६५ पासून याच धर्तीवर चालवतात. याबद्दलची माहिती खालील पत्रकात आपणास मिळेल. ग्राहकांचे दुकान मी स्वत: पुसदला जाऊन पाहून आलो आहे. दुकानचा पूर्ण नफा ग्राहकांना वाटण्यात येतो. दुकानचे मालक नोकर म्हणून मेहनताना फक्त घेतात. हिशेब ऑडिट होतो.

**—शं. बा. खोडके**
रिसर्च इन्स्टिटयूट, मगनवाडी, वर्धा.

१९ एप्रिल ६९ | चाळीस पैसे

# माणूस

मोहन वचन प्रमाण । घरसे शुरु होता दान । जे सी करे अर्थ प्रदान । मोह-न का अर्थ महान ।।

**ग्राहकांचे दुकान** **नॅडेप** **१९६८ चा बोनस**

१९६८ चा बोनस दर रुपयास ७ पैसे जाहीर करताना आम्हास आनंद होत आहे. १९६८ सालात झालेली एकंदर विक्री १९६७ पेक्षा ६% नी कमी असली तरीसुद्धा रिझर्व फंड न काढता व येणे असलेली रक्कम वसूल होईल हे गृहीत धरून बोनस दर रुपयास ७ पैसे जाहीर करीत आहोत. १९६९ सालात विक्री वाढल्यास बोनसची टक्केवारीही वाढेल व याकरिता नॅडेप ग्राहकांचे दुकानातून आपण खरेदी करणे आवश्यक आहे. ग्राहकांना विनंती की, त्यांनी आपली १९६८ सालची बिले नॅडेपमध्ये परत करावी व बोनसकार्ड घेऊन जावे. बिले परत करण्याची शेवटची तारीख श्रीरामनवमी दि. २७-३-६९ आहे, ( १९६८ च्या बिलाचे क्रमांक ३५४५३ ते ३८६३२ )

**श्री कुमारप्पा जयंती** **नॅडेप ग्राहकांचे दुकान**
दिनांक ४-१-६९ सुभाष टॉकीजसमोर, पुसद.

सजग साप्ताहिक
# माणूस

वर्ष : आठवे : अंक : सत्तेचाळीसावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

स. न. एप्रिल, ८

आपल्या २९ मार्चच्या अंकातले 'गायनीकळा' या ग्रंथावरचे माझे परीक्षण वाचले. पान ४४ वर मुद्राराक्षसानं केलेला गोंधळ पाहून 'कळा या लागल्या जीवा' अशी स्थिती झाली. 'कण' स्वर या ऐवजी 'ऋण' स्वर असे छापले आहे.

स्वरांच्या दुनियेत कलावंतांना 'ऋण' असतं, पण सुदैवाने 'ऋण' स्वर नसतात. कृपया याची नोंद घ्यावी आणि मला 'ऋणी' करावे.

अरविंद गजेंद्रडकर, पुणे.

स. न. एप्रिल, ५

आपला २९ मार्चचा अंक वाचला. त्यात जर्मन कारखानदार डॉ. कर्ट कोर्बर यांच्या गिरणदानाबद्दल वाचले. या संदर्भात आपण अशी पृच्छा केली आहे की, आपल्याकडील कारखानदार व जर्मनीमधील कारखानदार यामध्ये एवढी तफावत का ? आपल्या देशातील कारखानदारांना अशी बुद्धी का होऊ नये ? आमच्या पुसदला एक दुकान एका वेगळ्याच पद्धतीवर चालत आहे. या दुकानाच्या मालकांनी आपले दुकान

किंमत : ४० पैसे
१०२५ सदाशिव
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. कल्पित साहित्यातील पात्रे पूर्णपणे काल्पनिक आहेत.

ग्राहकांच्या नावावर केले आहे. व ग्राहकांना दरवर्षी नफ्याचा हिस्सा वाटण्यात येतो. डॉ. कोर्बर यांच्यापेक्षा हा दुकानदार निःसंशय एक पाऊल पुढे आहे. परंतु पाश्चात्य देशांत घडणारे ते चांगलेच या गैरसमजामुळे जी डोळे झाक आपण करतो त्यामुळे आपल्याकडील योजनांना योग्य ती प्रसिद्धी मिळत नाही.

**राजे नि. ब. देशमुख—पुसद,**

**स. न.** **मार्च, ३०**

२९ मार्चचा अंक एका दमात वाचून काढला. या वेळी 'झुंड' ने 'Show them everything' चा धक्का दिला.

दुष्मनोंको पनाह देनेवाले वो थे । संजीदा वुजुर्ग कोई ।।
अब तो इन्सानियत खाक मिल गया
हमदर्दीयोंकी सुबह तो क्या । 'वह रात' भी फिर न आयेगी ।।

असो. पंतनगरकडील बीट क्रांती आमच्या शेतकऱ्यांना नवे क्षितिज दाखवील अशा आशा आहे. डॉ. कर्ट कोवरना धन्यवाद.

**प्रमोद खोपकर,** मुंबई

स. न.

'डॉ. खोराना प्रकरणाच्या निमित्ताने' या माझ्या लेखाचा परामर्ष घेणारा श्री. सुधीर कामत यांचा ८ मार्चच्या 'माणूस'मधील लेख वाचला. या मुलाखतीचे संयोजन केले त्या वेळी या ज्वलंत प्रश्नावर वेगवेगळ्या शास्त्रज्ञांची परस्परविरोधी मते वाचकांच्या समोर यावीत हा एकच उद्देश माझ्यासमोर होता. त्यामुळे या निमित्ताने सुरू झालेल्या विचारमंथनात भाग घेऊन कोणी काही नवे विचार मांडले तर आपण सर्वांनी त्याचे स्वागत केले पाहिजे.—पण तरीही श्री. सुधीर कामतांचा लेख वाचून मात्र खेद झाला. खेद अशासाठी की, कामतांनी 'माणूस'च्या व्यासपीठाचा उपयोग कडवट स्वरूपाची बेजबाबदार टीका करण्यासाठी केला आहे. ही टीका करण्यापूर्वी माझा लेख संपूर्णपणे वाचण्याचे साधे औचित्यही त्यांनी दाखविलेले नाही.

आपल्या या लेखात श्री. सुधीर कामतांनी निदान सातदा तरी 'दाभोळकर म्हणतात' अशी सुरुवात करून काही विधाने केलेली आहेत. त्यांतील काही विधाने अशा स्वरूपाची आहेत, 'दाभोळकर म्हणतात, भारतातील संशोधनक्षेत्रातील जागा वृद्ध शास्त्रज्ञ अडवून बसलेले आहेत. दाभोळकर म्हणतात, खोरानांच्या स्विस बायकोला भारतात राहावयास आवडत नाही म्हणून खोराना अमेरिकेत राहतात. ही गोष्ट दाभोळकरांना काय खोरानांनी सांगितली काय?' माझा लेख सबंध वाचला असता तर कामतांनी असली बेजबाबदार उद्धट भाषा वापरली नसती. कारण लेखाच्या सुरुवातीलाच माझी भूमिका स्पष्ट करताना मी म्हटले आहे की,

" या मान्यवर शास्त्रज्ञांना भेटलो त्या वेळी माझ्याबरोबर माझे वा ' माणूस 'चे म्हणून एकही मत नव्हते. फक्त निरनिराळ्या वृत्तपत्रांतून आलेली व वर नोंदवलेली मते मी त्या शास्त्रज्ञांच्या समोर ठेवली व त्यांवरच्या त्यांच्या प्रतिक्रिया विचारल्या. "

आता निरनिराळ्या वृत्तपत्रांतून आलेल्या मताचे जनकत्व कामत माझ्यावर का लादतात? किंबहुना या मतांचा खरेखोटेपणा शोधण्यासाठी मी बाहेर पडलो होतो हे ते का विसरतात ? पुण्याच्या एका वृत्तपत्राने खोरानांचा रेल्वे स्टेशनवर अपमान झाला म्हणून ते चिडले असे लिहिले. दिल्लीच्या एका वृत्तपत्राने खोरानांच्या स्विस बायकोला आवडते म्हणून ते अमेरिकेत राहतात असे मत मांडले. या दोन्हीही परस्पर विरोधी मतांचे संकलन मी केलेले आहे, हे श्री. सुधीर कामत का विसरतात ? भारतात तरुण शास्त्रज्ञांना वाव नाही वा संशोधन क्षेत्रातील जागा वृद्ध शास्त्रज्ञ अडवून बसले आहेत असे विधान तर मी याच काय, पण इतरही कोणत्या लेखात कधी केलेले नाही. मी पण एक तरुण आहे. संशोधन क्षेत्रातच मी जमेल तेवढे काम करीत असतो. आणि भारतात तरुण शास्त्रज्ञांना फार मोठी संधी आहे हेच माझे व्यक्तिगत मत आहे. ' किर्लोस्कर ' मासिकात मी लिहिलेल्या डॉ. टिळक, डॉ. कुलकर्णी व डॉ. जाधव यांच्या परिचय लेखातून आग्रहाने मी माझे हे मत मांडलेले आहे. "लोकसत्ते'त डॉ. खोराना प्रकरणाच्या संदर्भात मी जो लेख लिहिला होता त्यातही माझे मत हेच होते.

श्री. सुधीर कामतांनी माझ्यावर केलेली टीका त्यांनी माझे प्रास्ताविक न वाचल्याचे उदाहरण आहे. मात्र डॉ. जोशींवर त्यांनी केलेली टीका त्यांना या मुलाखती न समजल्याची द्योतक आहे. कारण, कामत, डॉ. दवेंचे म्हणणे बरोबर आहे असे म्हणतात. आणि त्याच वेळी डॉ. जोशींचे म्हणणे पटत नाही, असे म्हणतात. पण खरे सांगायचे तर डॉ. दवे आणि डॉ. जोशी एकाच भूमिकेवर उभे आहेत. निदान त्या दोन शास्त्रज्ञांना तरी तसे वाटते ! कामत सांगतात त्याप्रमाणे भारतात बायोकेमिस्टचे काही काम नाही असे डॉ. जोशींनी कधी म्हटलेले नाही; पण भारतात जेवढ्या नोकऱ्या उपलब्ध आहेत, त्यापेक्षा अधिक बायोकेमिस्ट भारतात असतील तर त्यांनी खुशाल परदेशांत जावे, असे डॉ. जोशींचे सांगणे आहे. डॉ. दवेंचेही तेच मत आहे.

श्री. व्यंकटेश कामत यांच्यावर आरोप करताना तर श्री. सुधीर कामतांनी व्यक्तिगत स्वरूपाची खोटी टीका करण्याचा उच्चांक गाठलेला आहे. ' श्री. व्यंकटेश कामत जर प्राचार्य झाले असते आणि त्यांना संशोधनाची नितांत हौस असती, तर प्राचार्यपदावरूनही ते अधिक संशोधन करू शकले असते, हे श्री. सुधीर कामतांचे वाक्य असेच आडून टीका करणारे आहे. श्री. व्यंकटेश कामतांना प्राचार्यपद मिळाले होते आणि संशोधनात व्यत्यय नको म्हणून त्यांनी ते नाकारले ही वस्तुस्थिती आहे. ज्या माणसाला संशोधन करावयाचे आहे, त्याने प्राचार्यपद काय पण

विभागप्रमुखाची जबाबदारीही स्वीकारू नये हे खुद्द डॉ. नरगुंदांचे म्हणणे आहे. याच प्रशासकीय जबाबदारीत गुंतलेल्या रँग्लर परांजपे आणि प्राचार्य डी. डी. कर्वे काही संशोधन करू शकले नाहीत, असे मत डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या एका ज्येष्ठ आजीव सेवकाने पण मध्यंतरी मांडले होते. श्री. सुधीर कामतांना हे मत पटलेच पाहिजे, असे माझे म्हणणे नाही. पण श्री. व्यंकटेश कामतांनी जर या लोकांचा सल्ला स्वीकारला तर त्यांनी काही चूक केली असे म्हणण्याचाही श्री. सुधीर कामतांना काही अधिकार नाही. श्री. व्यंकटेश कामतांच्या प्रबंधांचा उपयोग काय ? प्रबंध लिहिणे म्हणजेच हुशारीचे गमक ही कल्पना चुकीची आहे अशा स्वरूपाची विधाने श्री. सुधीर कामत का करतात हे मला समजत नाही, कारण श्री. कामतांचे प्रबंध 'टेट्राहैड्रा' या जगविख्यात मासिकातून प्रसिद्ध झालेले आहेत हे मी स्पष्ट केलेले आहे. आणि 'टेट्राहैड्रा' हा रसायन क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याचा मानदंड समजला जातो. डॉ गांगुली यांच्या निरोप समारंभात श्री. व्यंकटेश कामतांनी "डॉ. गांगुलींच्या कर्तृत्वाला अमेरिकेत वाव मिळेल अशी माझी खात्री आहे' असे मत मांडले, असे सांगून श्री. सुधीर कामतांनी खोटे बोलण्याचा स्वतःचाच उच्चांक मोडलेला आहे. डॉ. गांगुली हे कामतांचे निकटचे स्नेही आहेत. डॉ. गांगुली हे माझेही जवळचे मित्र आहेत. आणि डॉ. गांगुली यांनी भारत देश सोडू नये म्हणून त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न अगदी चिकाटीने श्री. व्यंकटेश कामत यांनीच केला. ही वस्तुस्थिती आहे. डॉ. गांगुलींना पत्र पाठवून 'माणूस'चा कोणीही वाचक माझ्या या विधानाचा खरेपणा तपासून घेऊ शकतो.

विज्ञानक्षेत्रात एखाद्याने प्रयोग न करता खोटी अनुमाने दिली तर त्या संशोधकाला स्वतःच्या नोकरीचा राजीनामा द्यावा लागतो ! जाहीरपणे माफीही मागावी लागते. वैचारिक क्षेत्रातही अवधानाने वा अनवधानाने खोटी विधाने करणाऱ्यांनीही किमानपक्षी दिलगिरी व्यक्त करावी एवढीच माझी श्री. सुधीर कामतांच्याकडे मागणी आहे.

**– दत्तप्रसाद दाभोळकर**

नवी दिल्ली, ३१-३-६९

मुंबई समाचार

सु. ल. सोमण

# सहकारातील असहकार

देशात सर्वत्रच कॉंग्रेसला वाईट दिवस आले आहेत. १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकांनंतर महाराष्ट्र, म्हैसूर, आंध्र आणि गुजरात ह्या चार राज्यांनी कॉंग्रेसची खरीखुरी पत राखल्याचे दृश्य दिसून आले. ह्या चारच राज्यांत निर्विवाद बहुमत कॉंग्रेसला खऱ्या अर्थाने मिळवता आले. परंतु ह्या राज्यांतल्या कॉंग्रेस संघटनांनादेखील आता धक्के बसू लागले आहेत. त्यांच्यांतली अंतर्गत दुफळी चव्हाट्यावर येऊन संघटना खिळखिळी होऊ पाहत आहे. आंध्रात तेलंगणाचे निमित्त झाले, गुजरातेत व विदर्भात कृषिविद्यापीठाच्या चळवळी झाल्या; परंतु ह्या सर्वांपेक्षाही जबरदस्त हादरा महाराष्ट्र कॉंग्रेसच्या नशिबी आला. परवा सहकारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांविषयीचे विधेयक विधानसभेच्या चालू अधिवेशनातच पसार करून घ्यायचा निर्णय महाराष्ट्र मंत्रिमंडळाने घेतला तेव्हा! महाराष्ट्र मंत्रिमंडळाचा हा निर्णय समजताच, महाराष्ट्र कॉंग्रेसचे अध्यक्ष श्री. वसंतरावदादा पाटील ह्यांनी चार सहकारी संघटनांच्या अध्यक्षपदांचे राजीनामे सादर केले. मिल मझदूर संघाच्या अध्यक्षपदाचाही आपण लौकरच राजीनामा देणार असल्याचीही घोषणा त्यांनी ह्याच वेळी केली. महाराष्ट्र मंत्रिमंडळाचा हा निर्णय होण्यापूर्वी महाराष्ट्र कॉंग्रेसची खास बैठक भरली होती. त्या बैठकीत खडाजंगी चर्चाही झाली होती. " हे विधेयक जसेच्या तसे पसार करून घ्यायचे व तेही ह्या अधिवेशनात, हा निर्णय जर महाराष्ट्र शासनाने घेतला असेल तर आम्हांलाही काही उपाय योजावे लागतील. ...सहकारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांवर जर काही बंधने आपण लादू इच्छिता, तर तशीच बंधने मंत्र्यांवर लादली जावीत." अशा तऱ्हेचे आव्हानात्मक सूरही ह्याच सभेत उमटल्याचे वृत्त होते.

वास्तविक दोन-तीन वर्षांपूर्वीच हे विधेयक सभागृहासमोर यायचे! परंतु महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस व विशेषतः श्री. पाटील ह्यांच्या प्रखर विरोधामुळेच हे विधेयक सतत लांबणीवर टाकले गेले. " सहकारी संस्थेच्या अधिकारपदावर एकाच व्यक्ती ने

सहा वर्षापेक्षा अधिक काळ राहू नये व एकाच व्यक्तीने एकाच वेळी एकापेक्षा अधिक संस्थांच्या कार्यकारी मंडळावर राहू नये." ह्याच त्या सहकारी विधेयकांतल्या दोन प्रमुख क्रांतिकारी सूचना. ह्या सूचनांमुळे महाराष्ट्रातल्या सहकारी वर्तुळातल्या चाळीस-पन्नास प्रमुख अशा व्यक्तींवर अर्थातच आपापली पदे सोडण्याची पाळी येणार आहे. ह्याच पदांच्या जोरावर समाजात, राजकारणात व आर्थिक वर्तुळातही मातब्बर बनलेल्या ह्या मंडळींना ही पदे सोडताना क्लेश होणार नाहीत हे अगदीच अशक्य. ह्या मंडळींनी महाराष्ट्र शासनाविरुद्ध दंड थोपटावे हे अगदी साहजिकच होते. ह्यातली बरीचशी मंडळी पाच-पाच, दहा–दहा सहकारी व्यवसायांची पदाधिकारी मंडळी होती. नवीन संघटना वा चालू संघटनांतली पदे साधारणतः ह्या मंडळींतच विभागली गेलेली होती, आणि एकप्रकारे ह्या मंडळींची सहकारी चळवळीत मक्तेदारी निर्माण झाली होती. या मक्तेदारीपायी ह्यांचा दबदबा वाढला होता, ह्यांचे वजन शासनावर येऊ लागले होते. मध्यंतरी साखरेच्या धोरणाची पुनर्आखणी करताना ह्याच सहकारी मिरासदारांच्या दडपणाला भीक घालून शासनाला उत्पादनापैकी चाळीस टक्के साखर खुल्या बाजारात विक्रीला ठेवण्यासाठी परवानगी द्यावी लागली होती. थोडक्यात, भांडवलशाहीच्या मगरमिठीतून शेतकऱ्यांची सुटका करण्यासाठी अंमलात आणली गेलेली सहकारी चळवळ, सहकारी कारखानदारी काही मूठभर व्यक्तींच्याच हातांत गेली आणि त्यांतही मक्तेदारी आली. म्हणजेच सहकारी कारखानदारीच्या मूळ उद्देशांनाच सुरुंग लागला. त्यातही ही सहकारी चळवळ काही सधन बागायती शेतकऱ्यांतच केवळ त्यांच्याच कल्याणासाठी राबवली गेली. ह्या प्रकरणांतले एक साधे उदाहरण सांगायचे तर उसाबद्दलचेच सांगावे लागेल. जेव्हा उसाचा भाव टनास ७० रु. होता, त्या वेळी प्रत्यक्ष ऊस लागवडीचा खर्च ३० रु. टन एवढा होता. म्हणजेच तीस रुपये गुंतवणुकीवर चाळीस रुपये फायदा होता. नंतर वर्षभरात खर्च जेमतेम ४० ते ५० रु. टनांपर्यंत गेला. तेव्हा मात्र भाव १७५ रु. ते १८० रु. पर्यंत नेण्यात आला. अर्थात खुल्या बाजारात साखरेचा भाव दीड रुपयावरून चार रुपये किलोपर्यंत वाढला. सहकारी व्यावसायिकांना साडेनऊ टक्क्यांपेक्षा अधिक फायदा येत नाही व त्यामुळे उसाचे भाव वाढवून साखर कारखान्यांच्या फायद्याचे प्रमाण कमी दाखवण्यात आले. पण ह्यांतली मेख ही की, प्रचंड फायदा मिळवणारे ऊस उत्पादकच सहकारी कारखानदारी करीत होते. हा एकप्रकारे 'सहकारी भांडवलशाही'चाच नमुना म्हटला पाहिजे.

ह्या मक्तेदारीपायी डोईजड होऊ पाहणाऱ्या सहकारी नेतृत्वास नियंत्रण घालण्यासाठीच हे विधेयक विधानसभेत आणण्याचे ठरवले गेले. त्याप्रमाणे ते आणले गेले गेले व पासरही झाले. आश्चर्य हे की ह्या विधेयकाला विरोधकांचाही भरघोस पाठिंबा मिळावा. बहुतेक सहकारी नेते काँग्रेसचेच होते व त्यांचा दबदबाही

एवढा वाढला होता की, ह्या विधेयकामुळे त्यांना परस्पर शह मिळाल्यास विरोधकांना तो हवाच होता.

महाराष्ट्रात साखर उत्पादनाच्या क्षेत्रात सहकाराचे कार्य खरोखरच चांगले आहे. त्यांना केंद्राकडून भरपूर संरक्षण व सवलती मिळत गेल्या हे जरी मान्य केले, तरी त्यामुळे ह्या क्षेत्रातल्या कार्यकर्त्यांचे कार्य उपेक्षिता येणार नाही. अशाच कार्यकर्त्यांवर ह्या विधेयकाची कुऱ्हाड येणार आहे. कष्ट उचलून एखादी संस्था उभारायची, चार-सहा वर्षांत ती फुलते न फुलते तोच निवृत्ती स्वीकारायची असे बंधन पडले तर साहजिकच कार्यकर्त्यांतला उत्साह मावळेल व त्यात सहकारी चळवळीचेच नुकसान होईल. विरोधकांच्या ह्या आक्षेपातही काही तथ्य आहे. म्हणूनच मला असे वाटते, ह्या एका कलमाशिवाय हे विधेयक वादग्रस्त बनले नसते. आणि आता ह्या विधेयकातूनही पळवाटा शोधायचा प्रयत्न केला जाईल. एक गोष्ट मात्र निश्चित की, सहकारी चळवळीतल्या मक्तेदारीला हे विधेयक थोडाफार तरी पायबंद घालू शकेल.

---

# तारापूरची वीज

---

अणुशक्तीचा उपयोग विधायक कार्यासाठीच करायची संहारक अस्त्रे बनवण्यासाठी नाही हे आणुशक्तिविषयक धोरण भारताने पहिल्यापासून स्वीकारलेले आहे. अण्विक अस्त्रे तयार करण्यास असलेले आवश्यक तंत्रज्ञान भारताजवळ आहे व भारताने मनात आणले तर भारत केव्हाही अण्वस्त्रे बनवू शकेल, अशी ग्वाही अनेक भारतीय शास्त्रज्ञांनी दिलेली आहे. भारताच्या अणुविषयक प्रगतिविषयी माहिती असणाऱ्या पाश्चात्य शास्त्रज्ञांनाही ह्याविषयी संदेह नाही. परंतु असे असूनही, आणि काही विरोधी पक्षीयांकडून वेळोवेळी दडपण येत असूनही आपले धोरण भारताने बदललेले नाही. आपल्या वाटचालीचा मार्ग अधिक स्पष्टपणेच दाखवून द्यायचे धोरण भारताने स्वीकारले. तारापूरला परवाच एक एप्रिलला, भारताचे पहिले 'अणुवीजकेंद्र' सुरू झाले. भारताच्या धोरणाच्या दिशेने पडलेले हे पुढचे पाऊलच होते जणू !

अमेरिकन तंत्रसाहायाने हा प्रकल्प उभा राहिला. वास्तविक आठ महिन्यांपूर्वीच ह्या प्रकल्पातून वीज उत्पादनाला सुरुवात व्हायला हवी होती. परंतु रिॲक्टरला काही भेगा गेल्याचे आढळून आल्याने ह्या कार्यक्रमात फेरबदल केला गेला. मात्र दुरुस्त वेळापत्रकात सुचविलेल्या वेळेपूर्वीच एक महिना सर्व दुरुस्त्या करवून घेऊन प्रकल्प सुरू करण्यात आला; आणि पहिल्या तासाभरात १५००० किलोवॅट वीज उत्पादन झाली. पैकी प्रत्येकी अडीच हजार किलोवॅट वीज महाराष्ट्र व गुजरात राज्यांना मिळाली. ह्या वीजकेंद्राचा मुख्य फायदा महाराष्ट्र व गुजरात ह्यांनाच

मिळणार आहे. ह्यामुळे, ह्या दोन राज्यांत उद्योगधंद्यासाठी व घरगुती वापरासाठी लागणाऱ्या विजेचा जो तुटवडा भासतो तोही हळूहळू कमी होईल. प्रकल्प संपूर्णपणे सुरू झाल्यानंतर (म्हणजे १९७० साली) एकूण चारशे मेगॅवॅट इतके वीज-उत्पादन होऊ लागेल व त्यातून दोन्ही राज्यांच्या गरजा पूर्ण करता येतील.

ह्या प्रकल्पातली आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट म्हणजे, कुणाही भारतीयाला अभिमान वाटावा अशी भारतीय शास्त्रज्ञांची, इंजिनीयर्सची कामगिरी, प्रकल्पाचा मूळ आराखडा अमेरिकन शास्त्रज्ञांनी तयार केला होता हे जरी खरे असले तरी त्यात कित्येक मूलभूत सुधारणा भारतीय शास्त्रज्ञांनी सुचविलेल्या आहेत. ह्या शास्त्रज्ञांनी प्रचंड आघाडी मारलेली असून येत्या पंचवार्षिक योजनेतले आणखी असेच दोन प्रकल्प (राणाप्रताप सागर; राजस्थान व कल्पकाम, तामिळनाडू) सर्वस्वी ह्यांच्या जबाबदारीवरच उभे राहणार आहेत. ह्याशिवाय प्रकल्पाच्या कामासाठी ऐंशी तत्रज्ञ तयार केले गेले आहेत.

शास्त्रज्ञांनी अशा तऱ्हेने आपले काम चोख बजावल्यानंतर, हा प्रकल्प आर्थिक दृष्ट्याही नीट चालला पाहिजे. ह्याची जबाबदारी शासनावर राहणार आहे. त्यासाठी मध्यवर्ती शासनाला खंबीर पावले टाकावी लागतील. हिंदुस्थान स्टील (बोकारो, भिलाई व दुर्गापूर), भोपाळचे हेवी इलेक्ट्रिकल्स वगैरे कारखान्यांची सद्य:स्थिती पाहिली की भीती मनात डोकावून जाते. तारापूर व ह्यानंतर सुरू होणाऱ्या प्रकल्पातील वीज जनतेला स्वस्त तर पडलीच पाहिजे, पण त्याचबरोबर ह्या प्रकल्पांची आर्थिक स्थितीही स्वयंपूर्ण असली पाहिजे. ह्यासाठी काटकसर आणि चोख कारभार ह्या प्रकल्पांतून अंमलात आणला जाईल, ह्याची काटेकोर खबरदारी शासनाने घेतली पाहिजे.

---

# पुरीचे शंकराचार्य

---

हिंदूंच्या धर्मप्रमुखाला स्वत:च्या वर्तणुकीविषयी स्पष्टीकरण देणारे पत्रक काढावे लागते ही घटनाच मुळात अत्यंत खेदजनक आहे. पाटण्याला भरलेल्या विश्व हिंदू सम्मेलनाप्रसंगी पुरीच्या शंकराचार्यांनी अस्पृश्यतेचा पुरस्कार केला आणि 'जन-गण-मन' ह्या राष्ट्रगीताचा अपमान केला ही बातमी सर्वत्र प्रसृत झाली आणि देशभर शंकराचार्यांच्या निषेधाचा कल्लोळ उठला. त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कृती करण्यात यावी अशीही मागणी अनेक पुढाऱ्यांनी केली. स्वत:विरुद्ध उठलेले हे मोहोळ पाहताच शंकराचार्यांना घाईघाईने स्पष्टीकरण करावे लागले. परंतु दुर्दैवाने हे स्पष्टीकरणही मनाला फारसे पटणारे नाही. त्याशिवाय 'कल्याण' मासिकात त्यांनी व्यक्त केलेली मते आहेतच.

ह्या संदर्भात शंकराचार्यांच्या हिंदू-समाजांतल्या आजच्या स्थानाचाही विचार

करणे आवश्यक आहे. आद्य शंकराचार्यांनी धर्मातले भेद मिटवून, बौद्ध–जैन ह्यांनाही आपल्यात सामावून घेऊन हा हिंदू समाज बळकट केला. हिंदू–समाज संघटनेचे व हिंदू–धर्म–प्रसाराचे कार्य आपल्यापुढेही नेटाने चालावे म्हणून त्यांनी चार पीठांची स्थापना करून त्या त्या ठिकाणी 'शंकराचार्य' नेमले. परंतु आजचे किंवा गेल्या काही शतकांतले 'शंकराचार्य' हे कार्य करताना दिसतात का, ह्या प्रश्नाचे प्रांजळ उत्तर 'नाही' असेच द्यावे लागेल. उलट जाति–पाती, रूढी–बंधने ह्यामध्येच स्वतःला व हिंदू समाजाला अडकवून ठेवून, त्यांनी हिंदू–धर्म, हिंदू–समाज आकुंचनाला मदत केली आहे. बहुजन हिंदू–समाजापासून शंकराचार्य फार दूर फेकले गेले आहेत. ते स्वतः तर नाहीच, परंतु त्यांचे प्रतिनिधीही ह्या समाजापासून दूर दूर राहतात. त्यातच शंकराचार्यांच्या गाद्यांची भांडणे कोर्टापर्यंत जाऊ लागलेली आहेत. अर्थातच, पोपला किंवा मुल्ला–मौलवींना जे स्थान त्यांच्या त्यांच्या समाजात लाभते ते शंकराचार्यांना हिंदू समाजात मिळत नाही. ह्यांत राजकारण्यांनी अवलंबिलेली गेल्या शतकातली पक्षपाती धोरणेही काही अंशी कारण आहेतच. परंतु तरी सुद्धा ह्या संबंधीची जबाबदारी प्रत्यक्ष शंकराचार्य, त्यांची पीठे व त्यांचे प्रतिनिधी ह्यांची आहे व ती त्यांना टाळता येणार नाही. त्यांनी आपली जबाबदारी व्यवस्थित सांभाळली असती व एकजिनसी हिंदू–समाजाच्या बांधणीसाठी कंबर कसली असती तर, डॉ. आंबेडकरांसारख्या गीता–ज्ञानेश्वरीच्या, अभिमान्याला हिंदू धर्म सोडावा लागला नसता.

ह्या सर्वच प्रकरणावर फार मोठ्या विचार मंथनाची जरूरी आहे. या ऐवजी अधून मधून उठणाऱ्या ह्या मोहोळामुळे हिंदू समाजाला धोपटून काढून अल्पसंख्याकांची सहानुभूती (व मते) मिळवण्याचे दुष्ट राजकारण मात्र




खेळले जाते. म्हणूनच शंकराचार्यासारख्या असल्या वक्तव्यांचा निषेध कडक शब्दांत जरूर झाला पाहिजे. पण तो सामाजिक पातळीवर झाला पाहिजे, राजकीय नव्हे आणि जर तो तसा राजकीय पातळीवरून व्हायचा असेल, तर शंकराचार्यांबरोबर इतरांचाही झाला पाहिजे. संतति-नियमनाला विरोध करणाऱ्या पोपचा किंवा स्त्रियांना स्वातंत्र्य द्यायला विरोध करणाऱ्या मुल्लामौलवींचादेखील लोकसभेत निषेध झाला पाहिजे-

शंकराचार्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाचे चर्वितचर्वण सर्व हिंदू-समाजांतर्गत सामाजिक पातळीवर म्हणून झाले पाहिजे. ह्या संबंधात माजी गृहमंत्री श्री. नंदा ह्यांनी केलेली सूचना म्हणूनच मला स्वागतार्ह वाटते. ते म्हणतात त्याप्रमाणे शास्त्री, पंडित, साधू, बहुजन-समाजाचे प्रतिनिधी वगैरेंची परिषद भरवून ह्या प्रश्नावर खल व्हावा. ○


कै. श्री. ना. ह. पालकर यांनी लिहिलेला दुर्मिळ चरित्र-ग्रंथ

**डॉ. हेडगेवार**

पृष्ठे :- डेमी ऑक्टेव्ह अंदाजे १६+४७८+ऑफसेट चित्रे ३२ पृष्ठे
दोन आर्ट प्लेट्स : उत्कृष्ट कागद : मोहक मुद्रण : कापडी बांधणी
मूल्य पंधरा रुपये : डाक व्यय दोन रुपये

**श्रीदत्त जयंती शके १८९१ (दि. २३-१२-६९) पूर्वी ग्रंथ प्रकाशित होईल.**

**प्र सि द्धी पू र्व स व ल त**

दि. १६-५-१९६९ पर्यंत रक्कम भरणाऱ्या ग्राहकांना हा ग्रंथ आठ रुपयास मिळेल. (डाक-व्यय वेगळा)

स्थानिक ग्रंथ-विक्रेत्यांकडे संपर्क साधा अथवा आमच्याकडे लिहा

**हिन्दुस्थान साहित्य**

३०९ शनिवार पेठ, मोतीबाग, पुणे २

## □ 'वंदे मातरम्'चा अंत्यसंस्कार !

वंदन कुणाला करावे ? नमस्कार कुणाला घालावा ? समर्थांनी याचा बोध केलेला आहे. करावे देवासी नमन । संत साधु आणि सज्जन ।। किंवा, वेदज्ञ, शास्त्रज्ञ आणि सर्वज्ञ । पंडित पुराणिक आणि विद्वज्जन । याज्ञिक वैदिक पवित्रजन । नमस्कारीत जावे ।। हा सर्व बोध वाचीत असताना, यात, करावे देशासी वंदन । राष्ट्रगीताचे गायन—असे कुठेही सांगितलेले नाही. मूर्खांचीदेखील यच्चयावत लक्षणे टिपणाऱ्या प. पू. नारायणराव ठोसरांना, वंदन कुणाकुणाला करावे, याची यादी देताना राष्ट्र—राजा—मंत्री यांपैकी कुणीही आठवत नाही, यावरून शिवकालात 'राष्ट्र' ही कल्पनाच नसावी, असे म्हणावयास हरकत नाही. वाक्य पल्लेदार आहे की नाही ? शिवकालाचे सोडा, पेशवेकालातही साहेबाच्या फौजा— 'गॉड सेव्ह दि किंग' म्हणत असताना कुणा पेशव्याने 'राष्ट्रगीत' सुरू केल्याची नोंद नाही. ब्रिटिश मावाप सरकारने आपल्याला किती गोष्टी दिल्या ? मोजदाद करायची म्हटली तर मोठा ग्रंथ होईल ! कोटाची बटने कुणी दिली ? साहेबानें. कितीतरी दिवस साहेब पाटलुणीची बटने लावून भराभर घोड्यावर टाच मारीत आहे हे दिसत होते, तरी मराठे सरदार पेशवे मंडळी बाराबंदीच्या गाठी मारीत वेळ फुकट घालवीत होते. बटने चटकन लावून होतात हे पेशवाई गेल्यानंतर आपल्याला कळले. जाऊ द्या — अखेर कळले हे महत्त्वाचे. तेव्हा साहेबाने जशी विजारीला आणि शर्टाला बटने दिलीना, तसेच राष्ट्र, राष्ट्रगीत या कल्पना आपल्याला दिल्या !

राष्ट्र, राष्ट्रगीत या कल्पना तशा चांगल्या वाटतात. परंतु फार त्रासदायक आहेत. आता राष्ट्र म्हटले की आकार आला. क्षेत्रफळ आले. १९४७ सालापूर्वी भूगोलाच्या उत्तर पत्रिकेत पोरे भारताचा म्हणून जो नकाशा काढीत असत त्याचे क्षेत्रफळ ४८,८१,३४० चौरस किलोमीटर होते. आपण मग भारताचे तुकडे केले. तेव्हा इंडिया याने भारत ३२,६८,०९० चौरस किलोमीटरचा झाला. त्यानंतर आज प्रत्यक्ष किती किलोमीटरचा भारत नेहरूनंतर शिल्लक उरला आहे हे दिनेशसिंगांनाच नक्की माहीत नाही मग तुमची आमची काय कथा ? दिनेशसिंगांनी संसदेत सांगून टाकले — "आजचे क्षेत्रफळ नक्की ठाऊक नाही." ते जाऊ दे. मुद्दा असा की, राष्ट्र ही कल्पना मानली की क्षेत्रफळ आले. ते सर्व सांभाळणे आले. लढाईदेखील आली. बापरे ! आपण ही कल्पना साहेबाकडून घेतली नसती तर बरे झाले असते नाही का ? राष्ट्रगीताचे पाहाना. जगातले इतर लोक राष्ट्रगीत म्हणतात तेव्हा आपण अगदी म्हणायलाच पाहिजे का ? समजा, पृथ्वीतळावर

असाही एक देश असता की राष्ट्रगीत वगैरे काही नाही – तर काय फार बिघडणार होते ? परंतु साहेबाच्या संपर्काने हे लचांडही आपण गळ्यात घेतले.

राष्ट्रकल्पना पत्करल्यामुळे घोटाळा काय झाला बघा ! भारतमातेला वंदन करायचे म्हणून 'वंदे मातरम' असे मग देशभक्त गर्जू लागले. फासावर जाताना क्रांतिकारकदेखील मोठ्याने म्हणत – " वंदे मातरम्. " मंडळी, वंदे मातरम् हे प्रकरण फार फार जुने आहे.

महात्माजी त्या वेळी आफ्रिकेत होते. राष्ट्रकार्य मनोभावे करायचे तर कडकडीत ब्रह्मचर्य आवश्यक आहे हा साक्षात्कार १९०६ साली गांधीजींना झाला; त्या सुमाराची ही गोष्ट आहे. या वर्षाच्या अखेरीस जर्मनीमध्ये आंतरराष्ट्रीय समाजवादी नेत्यांचे एक संमेलन भरणार होते. साम्राज्यशाहीचे क्रांतिकारक शत्रू म्हणून लंडनमध्ये असलेल्या जातीय सावरकरांना या संमेलनाचे निमंत्रण होते. प्रत्येक प्रतिनिधीने संमेलनाला येताना आपल्या देशाचा ध्वज आणावा, असे तारेने कळवण्यात आले होते. दे. भ. मादाम कामा या विदूषींनी पोलक्यात लपवून भारताचा समाजवादी ध्वज जर्मनीला नेला. हेमचंद्र दास नावाच्या बंगाली तरुणाने रात्रभर जागून हा ध्वज तयार केला होता. या ध्वजावर राष्ट्रमंत्र कोरलेला होता – 'वंदे मातरम्. '

राष्ट्रमंत्राला काही पूर्वपीठिका असते. 'हरहर महादेव' हा युद्धघोष मराठ्यांनी अंगिकारला तो आजतागायत. तोच त्यांचा रणघोष आहे. वस्तुतः चालू पिढीची 'अष्ट-विनायक भक्ती' व 'गणपती उत्सवाची धांदल', तळ्यातल्या, मळ्यातल्या आणि गळ्यातल्या गणपतींची गर्दी पाहता 'गणपती बाप्पा मोरया' हा रणघोष अधिक पॉप्युलर होण्याची शक्यता आहे. परंतु 'गणपती बाप्पा मोरया' म्हणत कितीही अंगविक्षेप केले तरी लढाई जिंकता येईल, असे आपला शत्रू जनरल याह्याखानदेखील म्हणणार नाही. तेव्हा रणघोष म्हटला की, मराठ्यांना आठवणार ते गणपतीचे साक्षात पिताजी–हर हर महादेवच. त्याला इलाज नाही. अशा गोष्टींभोवती काही पिढ्यान्पिढ्यांचे संचित गोळा होत जाते.

बंकिमचंद्रांच्या 'आनंदमठ' या कादंबरीत अवतरलेले संपूर्ण काव्य – " वंदे मातरम् । सुजलां सुफलां । मलयजशीतलाम्... " हे एकदम देशाने म्हणजे त्या वेळी ब्रिटिशांशी झगडणाऱ्या काँग्रेसने राष्ट्रगीत पत्करले ते या 'वंदे मातरम्' राष्ट्रमंत्राच्या प्रभावानेच !

महात्माजींनी राजकारणात खिलाफत आणली तरीही 'वंदे मातरम्'वर आफत आली नाही. वर्षानुवर्षे राष्ट्रसभेच्या अधिवेशनांत, सभा-संमेलनांत राष्ट्रगीताचा मान या बंकिमचंद्रांच्या 'वंदे मातरम्'ने उपभोगला. १९३८ साली भारतीय राजकारणातील चाणक्य महंमदअली जीना यांनी या राष्ट्रगीताला पहिला अपशकुन केला. १९३८ च्या एप्रिलात महात्मा गांधी व जीना यांची तीन तास मुलाखत

झाली. म्हणजे गांधीजींनी जाऊन जीनांना कडकडून मिठीच मारली. पं. नेहरूही जीनांची पत्राने आळवणी करीतच होते. या वेळी जीनांनी मुसलमानांच्या वतीने खालील मागण्या स्पष्टपणे मांडल्या–

१ : मुसलमानांना गोहत्या करता यावी.

२ : ' वंदे मातरम् ' या गीताला राष्ट्रगीताचे स्थान राहू नये.

३ : उर्दू ही भारताची राष्ट्रभाषा व्हावी.

४ : तिरंगी झेंडा बदलावा.

५ : मुसलमानांची प्रतिनिधी म्हणून मुस्लीम लीगलाच मान्यता असावी.

६ : सर्व प्रांतांत काँग्रेस-लीग यांची संयुक्त मंत्रिमंडळे असावीत.

देणारे भेटल्यावर मागणाराने तरी कमी का मागावे ? महंमदअली जीना यांच्या मोहब्बतीसाठी, महात्मा गांधींच्या संमतीने काँग्रेस वर्किंग कमिटीने ' वंदे मातरम् ' या संपूर्ण गीतातील फक्त पहिली दोनच कडवी ही राष्ट्रगीत म्हणून कायम करून बाकीची ताबडतोब कापून टाकली.

वर्षभरात दुसरे महायुद्ध पेटले. वरील सर्व मागण्या जिथे पुऱ्या होतील असे पाकिस्तान, मुसलमानांसाठी आपण निर्माण केल्यानंतर शेष भारतात राष्ट्रगीत म्हणून संपूर्ण ' वंदे मातरम् 'चा स्वीकार करून पंडित नेहरू इथे राहिलेल्या मुसलमानांचा रोष ओढवून घेतात की काय, असा धोका होता. अर्थात पंडित नेहरू मोठे मुत्सद्दी होते. त्यांनी सांगितले, ' वंदे मातरम् ' बँडवर नीट वाजत नाही, काँग्रेस वर्किंग कमिटीने ज्या गीताला राष्ट्रगीत म्हणून वर्षानुवर्षे गौरविले तेव्हा ते कधी बँडवर वाजते का हा प्रश्नच उपस्थित झालेला नव्हता. बँडवर वाजले नाही तर ढोलकीवर वाजवू. परंतु हेच आमचे राष्ट्रगीत, असा मोठा घोष त्या वेळी होता. चालायचेच. नेहरूंना दुसरा शोध लागला. ' जन गण मन '...छान वाजते !

नेहरूंनी मग युक्ती केली. ' जन गण मन ' हे बँडवर वाजणारे राष्ट्रगीत व ' वंदे मातरम् ' हे फाशीच्या फळीवर वाजलेले गीत अशी दोन्ही त्यांनी राष्ट्रगीते म्हणून कागदोपत्री स्वीकारली. परंतु व्यवहारात 'वंदे मातरम्'वर गृह्यसंस्कार सुरू झाले. पंडितजींचे देहावसान होईपर्यंत लोकांची खात्रीच पटली की राष्ट्रगीत म्हणजे जन गण मनच. 'वंदे मातरम्'चा आग्रह धरणारा माणूस आता लवकरच देशद्रोही समजला जाईल, याबद्दल आम्हांला शंका नाही.

परंतु आमचे म्हणणे या मानगडी पत्करल्या नसत्या तरच बरे झाले असते. कारण, या काव्यातही घोटाळा आहे. प्रांतांची नावे आहेत.

पंजाब, सिंध, गुजरात, मराठा
द्राविड, उत्कल, वंग– !

आता दोन अडचणी आलेल्या आहेत. एक म्हणजे सिंध प्रांत हा पाकिस्तानात गेल्यानंतर तो आपल्या राष्ट्रगीतात कसा ? हे म्हणजे पाकिस्तानच्या प्रांतावर

पुरंदऱ्यांची दौलत

पुरंदऱ्यांची नौबत

ब. मो. पुरंदरे

मूल्य साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

डोळा ठेवण्यासारखे होते ! दुसरी अडचण म्हणजे आपल्या प्रांतांची संख्या सारखी वाढत जाणार ! हरियाना, मध्यप्रदेश, पाँडीचेरी, उत्तर प्रदेश, तामीळनाडू, राजस्थान हे आताच या गीतात नाहीत. आता लवकरच तेलंगणा, विदर्भ, मराठवाडा......मोपलास्तान हे प्रांत झाले की आली पुनः पंचाईत ?

परंतु महाराष्ट्र सरकार फार ' धीट ' आहे. त्यांनी चालू वर्षासाठी शासनाच्या ज्या दिनदर्शिका छापल्या आहेत त्यात छापले आहे–

**पंजाब सिंधू गुजरात मराठा**

आता सिंधचे सिंधू करायला ना. वसंतराव नाईकांनी काय कै. टागोरांना प्लँचेटवर बोलावले होते की काय ? परंतु कवी कवी काय–असले छपन्न टागोर कच्छपी लावण्याचे सामर्थ्य नाईकांपाशी आहे. सिंध काय–आणि सिंधू काय ? ही एक 'ऊ' पार्लमेंटला धाब्यावर बसवून महाराष्ट्र सरकारने राष्ट्रगीतात सरकवली आहे.... ' सिंध 'चे ' सिंधू ' करणार नाही असे आश्वासन पंडित नेहरूंनी दिले असताना ! नाइकांचेही बरोबर आहे. देशभक्तांना–फाशी गेलेल्यांना–दिलेले ' वंदे मातरम् 'चे आश्वासन जर नेहरूंनी पाळले नाही तर नेहरूंचे आश्वासन ना. नाईकांनी का पाळावे ? या गीतात तामिळनाडूचा उल्लेख नाही व यामुळे ते कुणाला समजत नाही, म्हणून मद्रासप्रांती या गीताचे तामिळ भाषांतर हे राष्ट्रगीत म्हणून म्हणू द्यावे असा आग्रह मद्रासप्रांती सुरू झालाच आहे. सर्व आनंदीआनंद आहे !

या सर्व कटकटींतून सुटण्याकरता, काँग्रेसने संसदेत बहुमत आहे तोपर्यंत असा ठराव करावा, की इतर देशांनी ओरबाडल्यानंतर राहील ते या राष्ट्राचे क्षेत्रफळ समजावे व टागोरांच्या मूळ गीतात यथायोग्य परिस्थितीनुसार फरक करून जे तयार होईल ते राष्ट्रगीत समजावे. ' वंदे मातरम 'चा वाद निकालात काढण्यात यावा. काँग्रेसमधील सर्व तुर्क, गारदी मंडळींनी गृहखात्याला हा ' वंदे मातरम् 'चा अंत्यसंस्कार पार पाडण्यासाठी इमानाने मदत करायला हवी !

---

## □ बुद्धिवादी के नगारनकी धाक सुनी ?

---

१८ एप्रिलला शिवजयंती आहे. महाराजांचे महाराष्ट्रातील तमाम पुतळे या दिवशी पुसले जातील व महाराजांच्या काळात ज्यांची आजची कीर्ती कानांवर येती, तर महाराजांनी कदाचित हात कलम केले असते अशी मंडळी या दिवशी स्वहस्ते महाराजांना हार घालतील यात शंका नाही. " यंदा माफ करा ! " अशी ठिकठिकाणच्या छत्रपती प्रेमिकांना पत्रे लिहिण्यात दत्तो वामन, पुरंदरे, गो. नी. दांडेकर, रणजीत देसाई, शिवभूषण यशवंत यांचे किती पोस्टेज खर्च झाले असेल याचा अंदाज

[पृष्ठ ६३ वर]

# चौथ्या योजनेतील शेती

तिसऱ्या योजनेत १० लाख टन नैट्रोजन खत दर वर्षी लागेल असा अंदाज होता. तिसऱ्या योजनेच्या सबंध कालखंडात हा अंदाज अवास्तव वाटत होता. याचे कारण त्या काळात शेतीक्षेत्राची फार मोठी पीछेहाट झाली हे होय. आता वार्षिक १० लाख २० हजार टन नैट्रोजन उपलब्ध होऊनही खताच्या मागणीच्या मानाने ते कमी पडत आहे. शेतीक्षेत्राच्या परिवर्तनाची ही एक मोठी खूण आहे.

हे परिवर्तन कसे झाले ? इंडियन इन्स्टिटयूट ऑफ् अॅग्रिकल्चरल रिसर्चचे श्री. स्वामीनाथन् म्हणतात, या क्षेत्राशी संबंधित असणाऱ्यांना १९६१ पासून ही जाणीव होती की शेतीचे पूर्णपणे नवे तंत्र आत्मसात करण्यास शेतकरी तेव्हाच प्रवृत होतील की जेव्हा त्यांना पिकात भरीव वाढ होण्याची खात्री वाटेल. औद्योगिक उत्पादनात १० वा २० टक्के वाढ ही मोठी मानली जाते; पण भारतीय शेतीक्षेत्रात बदल होण्यास याहून मोठ्या वाढीच्या आश्वासनाची आवश्यकता होती.

यासाठी भारतीय शेतीशास्त्रज्ञांनी अधिक उत्पादन देणाऱ्या बियाण्यांवर लक्ष केंद्रित केले. पूर्वीच्या उत्तम पिकांपेक्षादेखील दुप्पट जास्त पीक जेव्हा ही बियाणी देऊ लागली तेव्हा शेतकऱ्यांचा सर्व दृष्टिकोणच बदलला. आज हरित क्रांती दृष्टि-पथात येत असून शेतीक्षेत्राबाबत आत्मविश्वासाचे वातावरण आहे.

शेतकरी आज बदलण्यास तयार आहे. या त्याच्या मनःस्थितीचा फायदा चौथ्या योजनेमध्ये योग्यप्रकारे घेतला गेला तर भारत अन्नधान्याबाबत स्वावलंबी होऊ शकेल.

संशोधन, प्रशिक्षण व खते, अवजारे, जंतुनाशके यांचे वाजवी उत्पादन व त्वरित वाटप या गोष्टींवर तातडीने लक्ष केंद्रित केले नाही तर शेतीक्षेत्रातील सध्याची परिस्थिती बदलून ते पुन्हा पूर्वीच्या स्थितिशीलतेमध्ये प्रवेश करील तेव्हा शेती-क्षेत्राच्या प्रत्येक उपांगामध्ये बदलाचे हे तंत्र सतत चालू ठेवले पाहिजे.

नव्या शेतीधोरणाने बागायतक्षेत्राचा जास्त फायदा होतो आहे या टीकेबाबत

श्री. स्वामीनाथन म्हणतात, बागायत व जिरायत या दोन शेतकऱ्यांमध्ये आर्थिक तफावत आहे हे खरे आहे. परंतु ही तफावत दूर करण्यासाठी बागायत शेतकऱ्यांची प्रगती रोखण्याऐवजी जिरायत शेतकऱ्यांना उत्पादनाचे नवीन तंत्र अंमलात आणण्यास उद्युक्त केले पाहिजे. यासाठी सघन शेतीविकास योजना ( इन्टेन्सिव्ह अॅग्रिकल्चरल डेव्हलपमेंट प्रोग्रॅम ) 'संकुलशेती विकास योजनेत' ( इंटिग्रेटेड अॅग्रिकल्चरल डेव्हलपमेंट प्रोग्रॅम ) रूपांतरित केली पाहिजे.

या नव्या योजनेनुसार मानव, वनस्पती व पशुसृष्टी यांच्यांत एक प्रकारचा जीवशास्त्रीय सलोखा ( सिम्बायोटिक बॅलन्स ) निर्माण करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. शेती, ओलित, बांधबंदिस्ती, पशुसंवर्धन या साऱ्या क्षेत्रांच्या विकासाचा कार्यक्रम एकसंध व सुसूत्र असणे जरूर आहे.

भारतीय शेतीतज्ज्ञांच्या मते पुढील दोन वर्षांत आपण तांदूळ उत्पादन वाढविण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. सुमारे ४५ टक्के पाणीपुरवठा या पिकांवर खर्च होतो. जपान व तैवान यांच्याशी तुलना करता आपण तांदळाच्या सरासरी उत्पादनाच्या तीस टक्के एवढेही सरासरी उत्पादन दर एकरी करू शकत नाही. १ टन गहू पैदा होण्यासाठी २५ किलो नैट्रोजन लागतो तर १ टन तांदूळ पैदा होण्यासाठी १४ किलोच नैट्रोजन लागतो.

मात्र तांदळाचे पीक अधिक उत्पादन देणारे असले तरी प्रतिकूल वातावरणात वाढण्याची त्याची क्षमता कमी असते. यासाठी नव्या संकरित बियाण्यापासून तांदळाचे अधिक उत्पादन घेण्यासाठी शेतीचे तंत्र सुधारले पाहिजे.

तांदळाच्या पिकाचे दर एकरी उत्पादन वाढविण्यात सहाय्यकारी होतील अशा बियाण्यांच्या नव्या जाती प्रचारात आल्या आहेत. इंडियन अॅग्रिकल्चरल रिसर्च इन्स्टिटयूटने बसमती तांदळाची बुटकी जात ( ड्वार्फ ) शोधून काढली आहे. त्याचप्रमाणे सेंट्रल रिसर्च इन्स्टिटयूटने जया व पआ या दोन नव्या जाती प्रचारात आणल्या आहेत. तांदळाचे उत्पादन वाढविण्याचा एक देशव्यापी कार्यक्रम—ऑल इंडिया कोऑर्डिनेटेड राईस इंप्रूव्हमेंट प्रोजेक्ट—अंमलात येत आहे.

शेतीच्या सुधारणेसाठी शास्त्रज्ञांचे प्रयोग व प्रयत्न चालूच आहेत. मात्र या नवनवीन प्रयोगांचे सत्य स्वरूप व आवश्यकता ओळखण्याचा सुज्ञपणा नियोजनकारांनी दाखवावा व पुरेसा पैसा या कामासाठी उपलब्ध करावा, अशी शास्त्रज्ञांची अपेक्षा आहे. त्याचप्रमाणे तरतूद केलेला पैसा व मंजूर केलेले कार्यक्रम हे तावडतोब शेतकऱ्यांपर्यंत पोहोचतील यासाठी शासनयंत्रणेने एकाग्रतेने व त्वरेने काम करावयास पाहिजे. असे झाले तरच भारतीय शेतीक्षेत्राच्या सध्याच्या मनोधारणेचा फायदा आपणांस घेता येईल व अन्नधान्याबद्दलचे परावलंबन दूर करता येईल.

O

. . . . .

या 'का' ला उत्तर नाही.

कधीच नसते.

काळाचे हात ते.

त्यांना कोण अडविणार ?

डाव इथेच संपायचा होता.

... संपला.

उरले नाताशाचे गीत.

स्वप्नांचे...सुंदर स्वप्नांचे

ती सुगंधी डहाळी

तो निरोप...ते शब्द . . . . .

---

# वन्स अगेन अबाउट लव्ह

वसु भगत

तिचे डोळे अतिशय सुंदर होते.

... अगदी गाणारे डोळे म्हणावेत इतके सुंदर !

तिचे हसणे अतिशय सुंदर होते.

... अगदी पहाटेच्या कोमल, गुलाबी सूर्यकिरणांसारखे !

तिचे केस सुंदर होते ... तिचे ...

खरे म्हणजे ती सुंदर होती. चैत्रातील पौर्णिमेच्या रात्रीसारखी प्रसन्नसुंदर !

तिचा एक वैमानिक मित्र तिला नेहमी म्हणायचा, ती साऱ्या मॉस्को शहरातील सर्वांत सुंदर मुलगी आहे म्हणून ! म्हणायचा, तिचे हसू साऱ्या मॉस्कोतील सर्वांत सुंदर हसू आहे.



स्वर जुळले

तिचे नाव नाताशा.

ही सुंदर नाताशा एअर-होस्टेस होती.

सारखी हवेतून उडत असायची... या गावाला, त्या गावाला... या देशात, त्या देशात...

आणि तिचे मनही असेच सारखे उडत राहायचे पंख पसरून... स्वप्नांच्या देशातून स्वप्नांच्या देशात.

एकदा तिच्या आईने आणि तिने लॉटरीचे एक तिकीट घेतले होते. सारा दिवस-भर नाताशा स्वप्न पाहत होती... लॉटरी लागल्याचे... त्या पैशांनी एक स्कूटर विकत घेऊन मॉस्कोतल्या रस्त्यारस्त्यांवरून आणि गल्ल्यागल्ल्यांमधून भटकण्याचे...

ही सुंदर, स्वप्नाळू नाताशा तितकीच कर्तव्यदक्ष होती. संयमी होती. स्वतंत्र होती.

ती सुंदर हसायची. सुंदर बोलायची. उभी राहायची तीदेखील सुंदर.

त्यामुळे ती अतिशय लोकप्रिय होती.

आणि तरीही ती खोलखोल मनात कुठेतरी एकटी होती. एकाकी होती. अना-द्यन्त अवकाशातून देशोदेशी भटकणाऱ्या एकट्या विमानासारखीच...

तिच्या आयुष्यात एकेकाळी एक सुंदर तरुण आला होता. तो तिच्याच इमारतीत

राहत होता. हुशार होता. वर्गात नेहमी पहिला असायचा. असा हा तरुण असामान्य असेल असे तिला वाटत होते. पण तो सामान्य निघाला. अगदीच सामान्य. गोंधळलेला. जीवनाची दिशा हरवलेला. आपल्या स्वप्नांच्या सम्राट असामान्य असण्याचे तिचे स्वप्न भंगून गेले. आणि त्या क्षणी ती तिथेच थांबली होती.

त्या क्षणी तिला कदाचित कुणीच समजून घेतले नसावे. तिच्या वाटयाला कदाचित लोकापवाद आले असावेत... पण, तिला खोटे जगायचे नव्हते.

कारण, ती स्वत:शी विलक्षण प्रामाणिक होती.

खरे म्हणजे, तिच्या आयुष्यात अजून खरे प्रेम आलेच नव्हते. ज्याच्यासाठी वेडे व्हावे, बेभान व्हावे, सारे आयुष्यच्या आयुष्य भिरकावून द्यावे, अशा प्रेमाचा स्पर्श अजून तिच्या जीवनाला झालाच नव्हता.

नाताशा एकटी होती... अगदी अगदी एकाकी.

एका रात्री काम संपवून ती विमानतळावरून निघाली. नुकताच पाऊस पडून गेला होता. हवा सर्द होती. रस्त्यावरचे दिवे पाण्याने चिंब होऊन धूसर झाले होते. नाताशा एका कॅफेत शिरली. कॅफे प्रसन्न होते. तिथे तरुण युग्मे आनंदाने नाचत होती. हसत होती. नाताशा मात्र एका कोपऱ्यात एकटीच बसली होती. मध्येच कुणी एक कवी आला. त्याने ध्वनिक्षेपकावर आपली कविता म्हणून दाखविली. पण त्या आनंदाच्या, कैफाच्या क्षणी कविता कुणाला रुचणार होती ? बिचारा कवी खजील झाला. त्याचा उदास चेहरा नाताशाला पाहवला नाही. ती उठली. आणि म्हणाली, " कविता छान होती. मला खूप खूप आवडली."

आणि त्याच क्षणी तो आपल्या जागेवरून उठला. खटयाळपणे म्हणाला, "कवितेबद्दल नाही बोलत मी. या मुलीबद्दलच बोलतो. ती छान आहे. मला खूपखूप आवडली. "

ही त्यांची पहिली भेट. नाताशा आणि एवदोकिमोव यांची.

एवदोकिमोव हा मानसशास्त्र चिकित्सक होता.

उंच, सडपातळ, देखणा. विलक्षण आत्मविश्वास असलेला, धीट आणि तेवढाच फटकळ. त्याचे डोळे सुंदर होते. न बोलताही खूप बोलणारे.

या एवदोकिमोवने नाताशाला पहिल्याच भेटीत सांगून टाकले की, तू दिसतेस खुळी आणि हसतेस खुळीच.

पण, असे म्हणताना, त्याला खरे म्हणजे मनातून वेगळेच म्हणायचे असते. त्याला म्हणायचे असते की, नाताशा, तू खूप सुंदर आहेस. तुझ्यासारखी, सुंदर मुलगी साऱ्या रशियात तूच आहेस. तू हसतेसही खूप सुंदर. इतके सुंदर हसू साऱ्या सोविएत संघराज्यात फक्त तुझेच आहे.

प्रेमाची भाषा ही अशीच असते ! हीच असते !

हा धीट माणूस एवढे सांगूनच थांबत नाही, तर पहिल्या भेटीनंतर काही क्षणांतच तिचे चुंबनही घेऊन टाकतो.

आणि या क्षणी——नेमक्या याच क्षणी–ती दोघेही झपाटली जातात. झपाटलेल्या झाडासारखी.

" वन्स अगेन अबाऊट लव्ह " या चित्रपटात सांगितलेली कहाणी या झपाटल्या जाण्याचीच कहाणी आहे· गेल्या रविवारी " मराठा मंदिर " या चित्रपटगृहात मी हा रशियन चित्रपट पाहिला आणि एका वेगळ्या अर्थाने मीही झपाटून गेलो. त्यातली नाताशा आणि त्यातला एवदोकिमोव हे दोघे आजही माझ्या मनावर अजिंठ्यातल्या शिल्पाकृतीसारखे कोरले गेले आहेत. त्यांचे हसणे आणि रडणे, त्यांचे रुसवे आणि अनुनय, त्यांची भांडणे आणि मीलन, त्याचा संशय आणि विश्वास, त्यांचे तणाव आणि निश्वास सारे सारे आजही माझ्या मनात सूर्याच्या किरणांसारखे स्पष्ट आहे. त्यांच्या जीवनातला प्रत्येक क्षण अन् क्षण आजही माझ्या मनात गुलाबाच्या पाकळीवरील दवबिंदूसारखा ताजा आणि टवटवीत आहे. त्यांच्या प्रेमाचा सुगंध अजूनही विलक्षण हळुवारपणे दरवळतो आहे. आणि त्यांच्या दु:खाने माझ्या डोळ्यांत उम्या झालेल्या अश्रूंची स्मृतीही अजून ताजीच आहे.

मनाला असे भारून टाकणारा, हलवून सोडणारा, स्वत:बरोबर हसायला आणि रडायला लावणारा, नकळत स्वत:त विरघळून टाकणारा " वन्स अगेन अबाऊट लव्ह " हा चित्रपट म्हणजेच प्रेमावरची एक अत्युत्कट कविता आहे.

ते एक अंधाराबरोबर विरून जाणारे आणि तरीही कणाकणाने आठवणीत राहणारे स्वप्न आहे.

हा चित्रपट पाहताच मन कसे प्राजक्ताच्या कळीसारखे विलक्षण नाजुकपणे फुलत-उमलत जाते. आणि अखेर नाताशाच्या मृत्यूची बातमी ऐकताच सूर्यकिरणांच्या दाहक-कठोर स्पर्शाने कोमेजून जाणाऱ्या प्राजक्तपुष्पासारखेच कोमेजून जाते.

ही कविता...हे स्वप्न...हा चित्रपट म्हणजे बघताबघता आपला होऊन जाणारा, आपल्या रक्तात भिनून जाणारा एक उत्कट अनुभव आहे.

" वन्स अगेन अबाऊट लव्ह " हा चित्रपट म्हणजे नाताशा आणि एवदोकिमोव यांना पहिल्या भेटीत आणि त्यानंतरच्या अल्प सहवासात होणाऱ्या देहस्वी प्रीतीच्या जाणिवेपासून तो परस्परांबद्दल निर्माण झालेल्या एका अतूट आणि कल्मलशून्य श्रद्धेपर्यंत होणाऱ्या प्रवासाची कथा. दोघांच्या मनाची आंदोलने, दोघांत निर्माण झालेले मानसिक तणाव, भावनात्मक आंदोलने यांतून हा प्रवास होतो. या प्रवासात अनेकदा ती दोघे परस्परांविषयी संशय घेतात. त्यांना परस्परांविषयी अविश्वास वाटतो. ते परस्परांवर रुसतात. रागावतात. परस्परांपासून दूर व्हायचा निर्णय घेतात. परस्परांना भेटायचे नाही म्हणून निर्धार करतात. एखाद्या क्षणी शुद्ध व्यावहारिक पातळीवर उभे राहून परस्परांच्या प्रेमाची परीक्षा घेण्याचे ठरवतात...

पण, त्याच वेळी, या साऱ्या घनघोर वादळात जाणिवेच्या पलीकडे कुठतरी ते नकळत स्वतःलाच तपासत राहतात. स्वतःचीच परीक्षा घेत राहतात...परस्परांना भेटत राहतात. परस्परांचा अनुनय करीत राहतात. परस्परांवर विसावत राहतात.

आणि या आंतर्द्वंद्वातूनच जाणीव आणि जाणिवेपलीकडची जाणीव यांची लय साधते. सूर जुळतात. ती दोन आंदोलित विश्वे स्थिर होतात. एकाच पातळीवर येतात... एक होतात. एकजीव होतात.

त्यांना खऱ्या अर्थाने साक्षात्कार होतो. आपल्या प्रीतीची आपल्यालाच प्रचीती येते.

ही प्रचीती इतकी विलक्षण गर्द आणि खोल असते की, आपण आपल्या सहकाऱ्याचे चुंबन घेतल्याचे ती त्याला सहजपणे सांगू शकते. आपण पाणी प्यालो हे जितक्या सहजपणे सांगावे तितक्या सहजपणे. आणि तोही ती गोष्ट तितक्याच सहजपणे ऐकू शकतो. समजून घेऊ शकतो. कारण, ती त्याला आमूलाग्र कळली असते.

तिचे व्यक्तिमत्त्व, त्यांच्या कंगोऱ्यांसह आणि त्यातल्या कडेकपारीसह त्याला दिसलेले असते. समजलेले असते. उमगलेले असते.

अशी प्रचिती येणे ही प्रीतीची कुठली अवस्था ?

प्रारंभीची की अखेरची ?

अखेरची नक्कीच नव्हे !

कारण नाताशा आणि एवदोकिमोव यांचे सारे आयुष्य तर पुढेच पसरले होते. त्यांच्या जीवनाची आता कुठे सुरुवात झाली होती....

खरे म्हणजे ही कथा इथेच संपायला हवी होती.

पण, ती संपली नाही.

ती अजून पुढे जाते.

जीवनात अर्थ शोधणारी ही कथा क्षणात जीवनाचा अर्थ शोधू पाहते.

...एवदोकिमोवला अशीच एक उत्कट मिठी घालून नाताशा कामावर गेली होती. ती आज परत यायची होती. " डायनामो "जवळच्या संकेतस्थळी एवदोकिमोव तिची वाट पाहत होता. ती येणारच होती. भोवती खूप गर्दी होती. " डायनामो "त कसलासा कार्यक्रम होता. लोक जास्तीची तिकिटे आहेत का म्हणून विचारत होते. एवदोकिमोव नाताशाची वाट पाहत होता.

पण....

पण, नाताशा नाही आली. तिच्याऐवजी तिची सहकारी आली.

नाताशा आता येणार नव्हती. कधीच येणार नव्हती.

तिच्या विमानाला आग लागली होती. साऱ्या प्रवाश्यांना नाताशाने विमानाबाहेर सुखरूप बाहेर काढले होते. निघू शकली नव्हती ती फक्त नाताशा.

अजून आठवण झाली की गलबलून येते काळजात!

वाटते, का असा डाव अर्ध्यावर टाकून गेली ती ! का जावे लागले तिला ?

का ?

या ‘ का ’ला उत्तर नाही. कधीच नसते.

काळाचे हात ते. त्यांना कोण अडविणार ?

ही नियतीची इच्छा !...

डाव इथेच संपायचा होता...संपला.

उरले नाताशाचे गीत... स्वप्नांचे... सुंदर स्वप्नांचे....

तिने एवदोकिमोवला दिलेली निलगिरीची सुगंधी डहाळी...

आणि तिचा निरोप...धीर धरण्याचा. स्वतःवर विश्वास ठेवण्याचा....

" स्वतःवर विश्वास ठेव " हे साधेच शब्द.

आम्ही रोज सहस्र वेळा ते ऐकतो.

पण, नाताशा त्या व्यावहारिक शब्दांना भावविश्वात कोणत्या उंचीवर नेऊन ठेवते !

इथे नाताशाच्या या साध्या व्यावहारिक निरोपाला आकाशाची उंची लाभते. त्याला काव्याचे रूप प्राप्त होते. जीव विधून टाकणाऱ्या काव्याचे...काळीज पिंजून टाकणाऱ्या काव्याचे !

" वन्स अगेन अबाऊट लव्ह " या चित्रपटाचा आत्माच असा काव्याचा आहे.

याचे श्रेय पटकथेला आहे. इतकी सुंदर आणि बंदिस्त पटकथा चित्रपटासाठी लाभायला भाग्यच लागते. यात कुठल्याही नाटकी घटना नाहीत. तुमच्या-आमच्या जीवनातील घटना इत्यादी रादझिनस्की यांनी विलक्षण समर्थपणे या पटकथेत बांधल्या आहेत. यातला प्रत्येक क्षण व्यावहारिक आणि भावनात्मक पातळीवर तुम्ही-आम्ही कुठेतरी, कधीतरी पाहिला आहे. अनुभवला आहे. आणि तरीही त्या क्षणातले वादळी नाटच इथे आकाशासारखे विराट होऊन तुमच्या-आमच्यासमोर उभे होते. त्यातले उत्कट काव्य, त्यातले गंभीर नाटय, त्यातले घनघोर वादळ इथे पुन्हा नव्याने जाणवते. नव्याने प्रतीत होते.

घडणारे प्रसंग, घडणाऱ्या कृती, तसे पाहिले तर, अगदी सरळ साध्या आहेत. पण इथे त्या साध्या साध्या कृतींना विलक्षण अर्थसघन प्रतिकांचे रूप प्राप्त झाले. आहे· कॅफेत एवदोकिमोवशी पहिली भेट झाल्यानंतर नाताशाला टॅक्सी मिळत नाही. तेव्हा तासभर ती एवदोकिमोवच्या घरी जाते. तिथे दारातच वाघाचे एक सुंदर कातडे अंथरून ठेवले आहे. नाताशाला त्याचे सौंदर्य जाणवते. पण, त्याला स्पर्श करण्याचे मात्र ती कटाक्षाने टाळते. आत शिरताना ती अलगद पाऊल उचलून त्यावरून पलीकडे जाते. परस्परांच्या भावविश्वात जन्माला आलेल्या भावनांचे

सौंदर्य ती समजू शकते. तिला ती सुंदरता आवडते. हवीहवीशी वाटते. आणि तरीही ती सावध असते. तिच्या मनाचे उमाळे आणि त्यांना आवर घालणारे बंध कसे ताकदीने व्यक्त होतात या प्रसंगांतून. आणि त्या बाधाला तिचा स्पर्श होतो तेव्हा... तेव्हा ती झपाटली गेलेली असते. तिने आपल्या उमाळ्यात स्वतःला बेभानपणे झोकून दिलेले असते. त्या क्षणी तिच्या ओठांवर फक्त तीनच शब्द असतात... " आय लव्ह यू " आणि असतो एक चिरंतन प्रश्न... " डु यू लव्ह मी? " सारी रात्र ती हेच घोळवत राहते. पुन्हा पुन्हा हेच सांगत राहते. हेच विचारत राहते. फक्त एवढेच सांगत आणि विचारत राहते.

विमानतळावर मध्येच कधीतरी घडलेला एक निरोपाचा प्रसंग. विमान सुटायची वेळ झालेली आहे. नाताशा एवदोकिमोवचा निरोप घेते. सांगते, मी जाते आता, म्हणून. आणि विमानाकडे जाण्याऐवजी ती एवदोकिमोवच्या आणखी जवळ सरकते. " मला गेलंच पाहिजे " असे म्हणत त्याला घट्ट मिठी मारते. अशा वेळी शब्द आणि मन यांतला विरोध क्षणात कसा पहाडासारखा होऊन व्यक्त होतो. साऱ्या प्रसंगांत फक्त एवढीच कृती आणि एवढेच शब्द. पण, वाटते, हे एवढेच घडणार होते. फक्त हे एवढेच घडायला हवे होते. अशा क्षणी याहून आणखी काही वेगळे काही घडूच शकत नाही.

सारी पटकथा या आणि अशाच विलक्षण नाजुक, तरल आणि उत्कट प्रसंगांनी भरलेली आहे. रूढार्थाने ज्यांना घटना म्हणता येईल असे काहीच यात घडत नाही. नाताशा आणि एवदोकिमोव यांच्या भेटी आणि नाताशाच्या विमानाची उड्डाणे व परत येणे एवढेच यांत घडते. आणि तरीही ते सारे जीवन कवेत धरून ठेवते. यात हाणामारी नाही. पाठलाग नाहीत. धावपळ नाही. इतकेच काय, पण, ज्या अपघातात नाताशाचा अंत झाला त्या विमान अपघाताचेसुद्धा दृश्य नाही. तरीसुद्धा असे घनघोर नाट्य निर्माण होते की काळीज हलून जाते. यात दणदणीत संवाद नाहीत. सुभाषिते नाहीत. अलंकारिक भाषेने नटलेली पल्लेदार वाक्ये नाहीत. आणि तरीदेखील यातील प्रत्येक वाक्य, प्रत्येक शब्द, प्रत्येक उसासा मानवी भावविश्वाचे एक एक दालन उघडे करून दाखवीत राहतात. जाणिवेतील आणि जाणिवेच्या पलीकडच्या जाणिवेतील एकएक द्वंद्व, त्यातील साऱ्या सामर्थ्यानिशी व्यक्त करीत राहतात.

अशी ही समर्थ पटकथा जी. नातान्सन यांनी तेवढ्याच समर्थपणे चित्रित केली आहे. त्यांचा प्रत्येक शॉट कथेला मैलामैलांनी पुढे नेत राहतो. खरे म्हणजे, त्यांचा प्रत्येक शॉट हा समग्र प्रसंगात आणि सारा प्रसंग हा एकूण कथेत असा काही एकजीव झालेला आहे की, त्यांचे अस्तित्व पृथकपणे पाहणे किंवा दाखविणे शक्यच होत नाही. तीच गोष्ट तपशीलाची. साऱ्या चित्रपटातील प्रत्येक तपशील विलक्षण अपरिहार्यतेने आला आहे. मग, तो तपशील शब्दांचा असो, कृतीचा असो, नेपथ्याचा

असो, की कॅमेऱ्याच्या हालचालींचा असो. कित्येक शॉटस तर एखाद्या स्थिरचित्रा-सारखेच काही क्षण डोळ्यांपुढे राहतात. पापण्यांची हालचाल...जिवणीवर उमटणारे स्मित...डोळ्यांत तरंगणारे अश्रू...हातांचा निसटता स्पर्श...एवढेच काय ते घडते. पण, अशा वेळी कॅमेरा असा मांडला गेला असतो, की तो स्पर्श, ते अश्रू, ते स्मित एवढेच नेमके उगवणाऱ्या सूर्यासारखे डोळ्यांत भरते.

हे साधणे वाटते तेवढे सोपे नाही. त्यासाठी माध्यमाचा समज रक्तातच भिनून जायला हवा असतो. अशा प्रसंगासाठी विलक्षण " क्रेझी अँगल्स " लावले गेलेले मी अनेक चित्रपटांतून पाहिले आहेत. कॅमेरा जवळजवळ नेऊन फक्त हातांच्या, ओठांच्या, डोळ्यांच्या क्लोजअप्वर स्थिर झालेला मी पाहिला आहे. पण, इथे तसे घडत नाही. इथे कॅमेरा उभा राहतो तो नेमक्या अशाच जागी की नेमकी गोष्ट नेमक्या वेळी लक्षात यावी. हे अमाप श्रमांशिवाय साध्य होत नाही. त्याच्यासाठी व्यासंग करावा लागतो. अभ्यास करावा लागतो. पटकथेचे वाक्य न् वाक्य, त्यातल्या मधल्या रिकाम्या जागांसकट मेंदूत भिनावे लागते.

म्हणून तर, " वन्स अगेन अबाऊट लव्ह "मध्ये नाताशा व एवदोकिमोव यांच्या भेटीच्या प्रसंगांत छायांच्या छटाही मंद, हलक्या आणि हळुवार होतात. अशा प्रसंगांत जास्तीत जास्त वापर केला जातो तो प्रकाशाच्या वेगवेगळ्या छटांचा. आणि भावनात्मक वादळाच्या प्रसंगी छायांच्या छटांना अधिक प्राधान्य मिळते. प्रकाशाचा कचकचीत विरोध, अशावेळी दूर कुठेतरी पार्श्वभागी राहतो.

जी. नातान्सन यांनी कथेचा नाजुकपणा, सरलपणा, हळुवारपणा असा प्रत्येक ठिकाणी, प्रत्येक बाबतीत, प्रत्येक क्षणी अतिशय काळजीपूर्वक जपला आहे. अगदी संकलनातसुद्धा. काही प्रसंगांत शॉटस्ची बांधणी अशा काही कौशल्याने केली आहे की, एक शॉट संपून दुसरा कधी सुरू झाला हे कळतसुद्धा नाही आणि तेच काही प्रसगांत अगदी उलट घडते. शॉट बदलताना असा काही आघात देत बदलतो की, श्वास क्षणभर अवरुद्धच होऊन जातात. पण हे होताना लक्ष शॉटच्या सांध्यावर राहत नाही तर, त्यातून निघणाऱ्या अर्थाच्या वादळानेच आपल्याला व्यापून टाकलेले असते.

अशीच व्यापून टाकतात आणखी दोन माणसे. एक नाताशा आणि दुसरा एवदोकिमोव. तात्याना दोरोनीना या अभिनेत्रीने नाताशा रंगविली आहे. तिचा चेहरा विलक्षण बोलका आहे. तिचे डोळे खरोखरच स्वप्नात तरंगत असतात. तिच्या शब्दांत, शब्दोच्चारांत विलक्षण उत्कटता आहे. अलेक्झांदर लाझारेव म्हणजे एवदोकिमोव. या सडपातळ, उमद्या माणसाचे डोळे म्हणजे देणगी आहे त्याला मिळालेली. निदान या चित्रपटात तरी त्याचे डोळे मला विलक्षण सुंदर भासले. रुंद जिवणी असूनही नाताशा जशी सुंदर वाटली तसे !

ही दोघेही माणसे साऱ्या चित्रपटात डोळ्यांनीच बोलत होती. आणि त्यांच्या

डोळ्यांना त्यांचे हात, गाल, नाक, कपाळ साह्य करीत होते.

हा चित्रपट पाहून चित्रपटगृहाबाहेर पडलो तेव्हा वाटले होते, तेव्हाच काय, आता, या क्षणीसुद्धा, असेच वाटते की, तात्पाना दोरोनीनाखेरीज दुसरी कुणी नालाशा असू शकत नाही आणि अलेक्झांदर लाझारेवशिवाय दुसरा कुणी एवदोकिमोव असू शकत नाही. हे दोनही कलावंत त्या त्या भूमिकांसाठी केवळ आवश्यकच नव्हते, तर अपरिहार्य होते.

निदान " वन्स अगेन..." या चित्रपटाने तसे मनोमन वाटायला लावलेहे खरे !


असे वाटायला लावणे हेच तर कलावंतांनी कलाकृतीतून साधायचे असते.

त्यासाठी कलाकृती ही पाहणाऱ्याच्या जीवाला झळंबून जायला हवी असते.

आणि हलवून सोडणाऱ्या उत्कटतेवाचून असे जीवाला झळंबून जाणे कसे शक्य आहे ?

" वन्स अगेन अबाउट लव्ह " या रशियन प्रेमकथेने उत्कटतेचा असा विलक्षण अनुभव आणून दिला...

कलाकृतीतून मिळणारे असे हे अनुभव आपल्याही अनुभवविश्वाला संपन्न करीत असतात. समृद्ध करीत असतात. O



# नियमितपणें वापरल्यानें फोर्‍हान्स टूथपेस्ट हिरड्यांचे विकार व दंतक्षय यांना आळा घालते

तरुण तसेंच वयस्कर लोकांकडून आलेली अनाहूत प्रशस्तीपत्रें हिरड्यांचे विकार व दंतक्षय यांना आळा घालण्यात फोर्‍हान्स टूथपेस्टला मिळालेल्या आश्चर्यजनक यशाची स्तुति करतात. ही प्रशस्ती पत्रें जेफ्री मॅनर्स अॅण्ड कं. लि. च्या कोणत्याहि कार्यालयात पहावयास मिळतील.

मला दांतांच्या विकाराचा त्रास होत असे. मी आपली फोर्‍हान्स वापरू लागलो. आता मला दांतांचा कोणताच विकार नाही. सुमारे २० ते २५ लोक आधीची टूथपेस्ट बदलून फोर्‍हान्स वापरू लागले आहेत. आणि माझ्या कुटुंबात तर ती सर्वांची अत्यंत आवडती होऊन राहिली आहे."

—[illegible], पाटणा.

"शास्त्रीय पद्धतीने बनविलेली आपली फोर्‍हान्स टूथपेस्ट गेली दहा वर्षे मी वापरीत असून तिच्यामुळे माझे हिरड्यांचे सर्व विकार दूर झाले. आता माझ्या कुटुंबातील सर्वजण फोर्‍हान्स टूथपेस्टने नियमितपणे दांत घासतात."

—एस्. एम्. लाल, नवी दिल्ली.

## फोर्‍हान्स

### —दंतवैद्यानें निर्मिलेली टूथपेस्ट

दांतांची योग्य निगा राखण्यासाठीं फोर्‍हान्स टूथपेस्ट व फोर्‍हान्स दुहेरी कार्य करणारा टूथब्रश दर रात्री व सकाळीं वापरा... आणि आपल्या दंतवैद्याकडे नियमितपणें जात चला!



मोफत! "दांतांची व हिरड्यांची निगा" नामक रंगीत पुस्तिका

ही पुस्तिका आपल्याला मराठी, हिंदी अथवा इंग्रजीमधून मिळूं शकेल. त्याकरितां हे कूपन भरून (टपालखर्चासाठीं) १५ पैशांच्या स्टॅम्पसहित पुढील पत्त्यावर पाठवा : मॅनर्स डेन्टल अॅडव्हायझरी ब्यूरो, पोस्ट बॅग क्रमांक १००३१, मुंबई १.

नांव ______________________ वय ____

पत्ता ______________________

भाषा ______________________

54F-152 MR



चंद्रकांत वर्तक

# गोंडेगावचे

कॉलेजमध्ये एरवी आपल्या व्याख्यानांच्या ' पाटया ' टाकणाऱ्या माणसाला वाळूने गच्च भरलेल्या ' पाटया,' खेळण्याचे छान छान मैदान तयार करण्यासाठी म्हणून टाकायला लावल्या तर काय होईल ?

सक्ती केली तर तो रागाने लालबुंद होईल.

' राजाचे हक्क ईश्वरदत्त असतात ' असे म्हणणाऱ्या राजाच्या न्यायाप्रमाणे ' ह्या कामासाठी मी जन्माला आलेला नाही,' असे तो म्हणेल आणि त्याच्या दृष्टीने ' कर्मविपाकाचा सिद्धांत ' सांगेल.

आणि ह्यातले काहीच नसले तर ?

म्हणजे तो स्वतःहूनच ह्या ' पाटया ' वाहण्यात सामील झाला तर ?

तर भर उन्हात घामाने ओघळणाऱ्या त्याच्या शरीरातून श्रमसंगीत झंकारून उठेल. त्याच्या नादात तो जग विसरेल.

कसला तरी निराळाच प्रत्यय त्याला येईल.

त्याचे ' जग ' किती झापडबंद होते–तो कोणत्या भ्रामक अवस्थेत जगत होता त्याला हे कळेल–हा संस्कार त्याच्या मनावर उमटेल–तो अंतर्मुख होईल–दिशाहीन अशा त्याच्या जगण्याला दिशा लागेल...

डॉ. बर्वे सांगत होते,

रोज दवाखान्यात शेकडो माणसांना मी बघतो. त्यांचे बोलणे, चालणे लक्ष देऊन ऐकतो. पण तेवढ्याने समाधान होत नाही. नुसते औषध देऊन काय होणार ? काय केले म्हणजे ह्या माणसांच्या जवळ जाता येईल ? सूर्याचे किरण जसे झरोक्यातून आत शिरतात व सर्व लखलखीत करतात, त्याप्रमाणे ह्या माणसांच्या अंतःकर-

# श्रमसंस्कार शिबिर

णांच्या झरोक्यातून आत शिरता येईल का ? अंतर्याम लखलखीत होईल का ?
ह्या प्रश्नाच्या उत्तरासाठी हे शिबिर. गांधी जन्मशताब्दीचा योग साधून ते उभारले गेले.

शुक्रवार दि. ७ मार्च, १९६९. गोंडेगावच्या शाळेच्या व्हरांड्यात मी बसलेला. संध्याकाळ उतरलेली. समोरच्या नाल्यात—ज्यात आता थोडेच पाणी आहे, त्या नाल्यात—ती झाकोळते आहे. पलीकडच्या मळयात ह्याही वेळी एंजिन चालू आहे आणि पाण्याची धार शेतात सोडली जात आहे. धूळच धूळ सगळीकडे आहे. गुरे परतली आहेत.

लांबून बोलठाणहून धूळ उडवत येत असलेला ट्रॅक्टर दिसतो आहे. त्यात शिबिरात सामील होणारी माणसे आहेत आणि इकडून शाळेच्या बाजूने मुलांचे घोळके जातेगावहून चालत येत आहेत. रोहिल्याहून, साकरीहून, बोलठाणहून चालत येत आहेत. त्यांच्या शिबिराला पदयात्रेनेच सुरुवात झाली आहे. अनवाणी, पाठीवर पिशवी. त्या पिशवीत रात्रीच्या जेवणाची भाकरी आहे, आणखी एक चड्डी-सदरा आहे. टॉवेल आहे, एक वाकळ आहे अंथरायला.

एरवी गोंडेगावातली ही उतरलेली संध्याकाळ भलतीच उदासवाणी, नीरव. ही शांतता मनाला आणखीनच मुके करून टाकते. हे गाव बाकीच्या जगापासून आधीच तुटलेले, त्यात ही नीरवता तुटलेपणाची आणखी थोडी भर टाकते. पण आज गजबजाट वाढला आहे. गावातले घर नि घर जागे झाले आहे. अंधार तुडुंब भरत चालला तरी आज जाग आहे.

गोंडेगावला श्रमदेवतेची जत्रा आहे आणि गावकरी त्याची तयारी करीत

आहेत. बायाबापड्या एवढ्या माणसांच्या पोळ्या लाटायला नि भाजायला पदर खोचून तयार आहेत. कुणी एवढ्या स्वयंपाकाला सरपण किती लागेल याचा हिशेब करीत लाकूड फोडताहेत. सकाळच्या न्याहारीला मठ (मूग) द्यायचे म्हणून भिजविले आहेत. आज पारावरच्या गप्पांना वेळ नाही.

एकूण माणसे गर्दीत.

शिबिर तर सुरू झाले.

एकशेतीस विद्यार्थी, तीस विद्यार्थिनी, सत्तर शिक्षक, दोन (फक्त) प्राध्यापक, पाच–सहा डॉक्टर्स, काही सामाजिक कार्यकर्ते, हौस म्हणून सामील झालेली आणखी पंचवीस मंडळी ( स्त्री–पुरुष ) अशी तीनशेपर्यन्त संख्या, अधिक अमाप उत्साह.

ह्यात माधानकर (अमरावती जिल्ह्यातील माधान गाव )मंडळींच्या खटकेबाज, परिस्थितीवर प्रकाश टाकणाऱ्या फटके, कटाव, गोंधळ ह्यांची भर.

सगळा जम कसा जुळून आलेला.

मग मने फुलतील तर नवल काय ?

दोन दिवस सकाळचे तीन, तीन तास साऱ्यांनी शाळेचे क्रीडांगण तयार केले. खड्डे असलेले, कुठली लेव्हलच नाही. असे ते मैदान नाल्यातल्या वाळूची भर घालून, चारी बाजूंनी दगडांचा चौथरा उभारून तयार केले. त्याला लेव्हल आणली. ते इतके सुंदर झाले की संध्याकाळी तेथे हुतूतूचे सामने जोसात झाले.

सकाळचे श्रमसंस्कार झाले की, दुपारी झोप काढण्याऐवजी बौद्धिक खाद्य देण्याची सोय ह्या शिबिरात होतीच. इतके शिक्षक जमल्यावर ' श्वेतपत्रिके 'शिवाय त्यांना तरी विषय कुठला सापडणार ? त्यांच्या चर्चेत एक गोष्ट लक्षात आली. ती अशी की, आपली ' श्वेतपत्रिका ' कमालीची पुस्तकी आहे. महाराष्ट्रातल्या खेड्यामधल्या जीवनाचा पट तिने लक्षात घेतला असता तर तिच्यातला पुस्तकीपणा गेला असता. खरेखुरे जीवनशिक्षण तिने पुरस्कारिले असते. गोंडेगावच्या शाळेत शेती-शिक्षणावरच भर हवा आणि गोंडेगावसारखीच तर महाराष्ट्रात गावे विखुरलेली आहेत. गाव, त्याचा परिसर, गावाच्या गरजा हे पाहून त्यानुसार शिक्षणातले विषय हवेत. शहरी पोषाखी शिक्षणाचा तेथे काही उपयोग नाही. शेतकरी सुशिक्षित हवा आहे. म्हणजे त्याचा छळ होणार नाही, तोही फसणार नाही, शेतीत नवे प्रयोग करून तो उत्पादन वाढवील असा होईल असे शिक्षण हवे. श्वेतपत्रिकेत ह्या दृष्टीने काहीच नाही.

शिक्षक अशी चर्चा करीत होते तर तिकडे ग्रामस्थांपुढे कुक्कुटपालनाबद्दल डॉ. गोसावी सांगत होते. ग्रामीण आरोग्याबद्दल डॉ. बर्वे बोलत होते; शिक्षकांपुढे, विद्यार्थ्यांपुढे प्रा. वर्तक बोलत होते. प्रा. पाटणकर ग्रामस्थांपुढे, प्रा.लता पाटणकर महिलांपुढेही बोलल्या. प्रा. वर्तकांनी मुलांना गोष्टी सांगितल्या. डॉ. बर्वे इत्यादींनी

जवळजवळ शंभर मुलांना ट्रिपल इंजेक्शन्स्, पोलिओ प्रतिबंधक डोस दिले. तेथल्या मारुतीच्या देवळात ह्याची व्यवस्था केलेली होती.

ह्याच्या जोडीला मंडळींची आपापसात शिबिराच्या तत्त्वासंबंधी चर्चा झडत त्या वेगळ्याच.

रात्री मनोरंजनाचे कार्यक्रम.

ह्या शिबिराचे स्वरूप अपक्षीय होते. त्याला कोणताही राजकीय वास नव्हता. त्यामुळे विविध प्रकारची तत्त्वप्रणाली स्वतःशी बाळगून असलेली मंडळी जमली होती. श्रीमती ताराबेन मश्रूवाला आजारी असूनही आल्या. नासिक जिल्हा परिषदेचे श्री. अशोक देसाईंनी उद्घाटन केले. जिल्हाधिकारी श्री. राजाध्यक्ष, शहापूरचे श्री. दातार, श्री. वामनराव यार्दी, श्री. भार्गवे गुरुजी, नांदगावचे श्री. गर्गे, श्री. निमगावकर, श्री. सोनार, श्री. थत्ते (शिदिर कार्यवाह) गोंडगावचे सरपंच हे सर्व आपल्या घरातलेच कार्य समजून काम करीत होते. सेवादलाचे श्री. परीट तर ह्या शिबिराचे प्रमुख होते.

ह्या शिबिरामध्ये वावरताना मी गावातही हिंडत होतोच. तेथल्या राजवाड्यात (वाडीत) गेलो होतो. एका घरात सकाळीच बोलत बसलो. तेथली माणसे बौद्ध आहेत. त्यांचे म्हणणे असे – बौद्ध झाल्यावरही परिस्थितीत फरक पडलेला नाही. कायदा झाला आहे हे ठाऊक आहे. विहीर वेगळीच आहे–पाणी भरायची. देवळात येऊ देतातच असे नाही. आज तुम्ही भले लोक आलात, म्हणून आम्ही काही सुधारायला पाहू तर गावगाडा ते चालू देणार नाही. तुम्ही गेल्यावर आम्हांला इथल्याच लोकांशी व्यवहार करायचा आहे हे सर्व ऐकल्यावर मनात निराळाच प्रकाश पडला. तेथून उठलो व स्पृश्य वस्तीतल्या एका घरी गेलो. तेथल्या एकुलत्या एका मुलीला पोलिओ झालेला. पहिला मुलगा यमाने नेलेला. वाटणीत थोडी जमीन मिळालेली. पण मोठा भाऊ नावावर करून देत नाही म्हणून वांधा. त्याच्याशी बोलता, बोलता विचारले – ' गावात ब्राह्मणांची घरे किती ? ' तो म्हणाला – ' गावात ब्राह्मण नाहीच. ' मी म्हणालो–' सत्यनारायण, लग्न वगैरे काही आले तर तुम्हीच सर्व मंत्र म्हणता का ? ' तो बोलला–' तसे कसे करता येईल ? ब्राह्मण हवाच – त्याला दक्षिणा द्यायला हवी तरच फळ मिळेल.' मी बोललो –' दक्षिणेचा व फलाचा काहीच संबंध नाही. तुम्ही स्वतःचे स्वतःच करू लागा. ' तो उद्गारला – ' तुम्ही सांगा, पण पटायचे नाही हे. ज्याचे काम त्यानेच करावे. '

ही दोन घरे माझ्या मनात घर करून बसली. दोन्ही घरांत दारिद्र्याची सीमा होती. अशीच इतर असणार (आहेतच). माझे मन भरून आले – वाटले, आपल्याला किती पुढे जायला हवे ? कोणत्या थरावर सुधारणा करायला हवी आहे ? काय हक्क आहे आपल्याला चांगले चुंगले खाण्याचा, उत्तम वस्त्रे पेहरण्याचा ? मनोवृत्तीसुद्धा चाकोरीतून बाहेर काढायला हव्या आहेत. अन्याय इत्यादींची जाणीवच नाही

इतकी बधीरता. हाही महारोगच ! गावेच्या गावे अशी सडताहेत, झडून जाताहेत. आपल्या योजना येथे फिरायला हव्यात. नुसते कारखाने उभारून होणार नाही.

परतताना माझी उदास अवस्था झालेली होती. मन थाऱ्यावर नव्हते.

माझ्यावर गोंडेगावाचा झालेला संस्कार असा होता.

**याच शिबिराच्या वतीने गोंडेगाव येथील चाळीस कुटुंबांच्या पाहणीचा एक कार्यक्रम योजला गेला होता. या पाहणीचे टिपण :**

१. साक्षरतेचे शेकडा प्रमाण ३६% आढळले.

(काही वर्षांपूर्वी 'ग्रामगौरव' झाला असल्याबद्दलची माहिती मिळाली.)

२. व्यवसाय मुख्य शेती हा आहे. ७५% स्वतःच्या मालकीची शेती आहे. बागायत १७% व जिराईत ८३% आढळली. शेतमजूर १३%, सुतार काम ५%, किराणा दुकान ४%, चांभारकाम ४%, दोर वळणे २$\frac{1}{2}$% (घायपात) इत्यादी जोडधंदा तेथे केला जातो.

३. शेतीविषयक दृष्टिकोण ६६% लोकांत आहे (खते, बी-बियाणे, कीटकनाशके. इ.)

४. सरकारी सवलतींचा फायदा ६५% शेतकऱ्यांनी घेतलेला आहे. परंतु लाल फितीच्या अडसराविषयीची घृणा, चांगल्या विकास योजना असूनही राबवण्याची पद्धत व दप्तरदिरंगाई सदोष व त्यामुळे शेतीचे नुकसान असा अभिप्राय बहुतेकांचा आला.

५. कुटुंबनियोजनाबाबत सर्वसाधारणपणे कुटुंबातील प्रमुखांचे मत अनुकूल दिसते. परंतु अधिक योजनाबद्ध मार्गदर्शन मिळाल्यास प्रत्यक्ष कुटुंबनियोजन आचरणात येईल. त्यांपैकी १२$\frac{1}{2}$% लोकांना कुटुंब नियोजनाविषयी माहिती नसल्याचे आढळून आले. त्यांपैकी १२$\frac{1}{2}$% लोकांचा विरोध आढळला. (प्रत्यक्ष कुटुंबनियोजन झालेल्यांची माहिती मिळाली नाही.)

६. जातिभेदाच्या कल्पना मानणारे ३३% नाहीत असे म्हणतात व ६६% जातिभेद मानतात.

७. बालविवाह, भुतेखेते, गंडेदोरे, अंगारेधुपारे, ह्यांवर विश्वास ठेवणारे लोक ५५% आढळले.

८. मध्यम राहणीमान असलेली ७५% कुटुंबे आढळली व मागासलेली २५% कुटुंबे आढळली. कमीत कमी उत्पन्न ५०० रु. आढळले. जास्तीत जास्त २०,००० (वार्षिक) आढळले.

९. आरोग्यविषयक दृष्टिकोण ७०% लोकांत आढळला नाही. १२½% कुटुंबांनी सांडपाणी व शोष खड्डे करून ठेवलेले आढळले. त्यांना शास्त्रीय दृष्टिकोणातून माहिती दिल्यास लोक शोषखड्डे करतील.

१०. गावातील बहुतेक पशुधन शेतातच होते. त्यांना कंपोस्ट खताची शास्त्रीय माहिती मिळाल्यास शेती सुधारण्याच्या दृष्टीने जास्त फायदा होईल हे निश्चित.

११. आपल्या मुलांचे भावी आयुष्य सुखाचे जावे म्हणून कुटुंब प्रमुखाने तरतूद केलेली फक्त २½% कुटुंबे आढळली. बँकेत खाते.

१२. विम्यासंबंधीची माहिती नव्हती व एकाही कुटुंबप्रमुखाने विमा उतरल्याचे आढळून आले नाही.

१३. बहुसंख्य लोकांत धर्मश्रद्धा आढळली.

१४. घायपाताचा धंदा करणाऱ्यांची स्थिती अत्यंत निकृष्ट आढळली. घायपात विकत घ्यावी लागते. त्यामुळे जीव जगणे अशक्य. आठ महिने मजुरी मिळत नाही व फक्त आठ आणे रोज पडतो.

१५. गावात अस्पृश्यता पाळण्यासंबंधी अट्टाहास दिसला नाही. परंतु २१ वर्षे स्वातंत्र्य मिळूनदेखील हरिजन देवळात जात नाही व सार्वजनिक विहिरीवर पाणी भरताना दिसत नाही. त्यांच्यासाठी स्वतंत्र त्यांच्या वस्ती-जवळ पंचायत समितीने विहीर बांधली आहे. परंतु आज ग्रामस्थ त्या ठिकाणी विहिरीवर पाणी भरताना दिसले नाहीत.


१६. हरिजनांचे केशकर्तन गावात होत नाही. बोलठाण, जातेगावला व शहरात सलूनमध्ये जावे लागते.

१७. मागासलेल्या व गरीब लोकांना बिकट आर्थिक परिस्थितीमुळे अल्प मोबदल्यात कोणतीही कामे करावी लागतात.

१८. हरिजनांना देवळात प्रवेशबंदीचा अट्टाहास नाही. परंतु हरिजन आपल्या पायरीनेच वागतात असे उद्‌गार माहिती घेत असता एकाकडून ऐकले. धनुर्वात, घटसर्प, डांग्या खोकला यांची लस मुद्दाम आम्ही मारुतीच्या देवळात टोचली. त्या वेळी हरिजनांची मुले देवळांत आली होतीच. गावकऱ्यांचा विरोध दिसून आला नाही.

(साप्ताहिक ' देशदूत 'च्या सौजन्याने)

○



**लेखक**

ब्रिगेडिअर

जे. पी. दळवी

**अनुवाद**

ॲडव्होकेट

माधव कानिटकर

**लेखांक**

सातवा

१९५९ च्या ऑगस्ट महिन्यात पंतप्रधान पंडित जवाहरलाल यांनी लोकसभेत जरी ' संपूर्ण नेफा विभाग संरक्षणासाठी भारतीय सेनेच्या ताब्यात देण्याचा हुकूम मी दिला आहे ' असे जाहीर केले असले तरी नेफामध्ये प्रत्यक्षात भारतीय सेना शिरली ती नोव्हेंबर १९५९ मध्ये. प्रत्यक्ष देशाच्या पंतप्रधानांचा हुकूम अंमलात आणायला सैन्याला ३ महिन्यांचा कालावधी लागला, ही गोष्ट काय दर्शविते ? उघड आहे की आपली लढण्याची तयारी कमी पडणार याची भारतीय सेनेला आतून जाणीव होती आणि फुकट मरण्यासाठी हिमालयासारख्या दुर्गम प्रदेशात भारतीय लष्कराची गुंतवणूक करायला लष्करी अधिकारी नाखूष होते.

उलट, ऑगस्ट ते ऑक्टोबर १९५९ या कालखंडातच भारतीय सरहद्दीवर गडबड माजविण्यात चैन्याने वेळ साधली होती. याच कालखंडात संरक्षणमंत्री मेनन आणि जनरल थिमय्या यांच्यात चांगलाच बेबनाव झाला होता. भांडणे विकोपाला गेली होती. चिन्यांना या महत्त्वाच्या बातमीची खबर नसेल असे वाटते तुम्हांला ? शिवाय ऑगस्ट ते ऑक्टोबर या महिन्यांत हिमालयातले नैसर्गिक हवामान भारतीय सैन्याला आगेकूच करण्याच्या

सरकारचा हुकूम पाळणं हे जसं सोल्जरचं कर्तव्य आहे तसंच वेळप्रसंगी 'सरकारचा हुकूम मी पाळणार नाही कारण तो देशविघातक आहे, असं स्पष्ट सांगून तो चुकीचा हुकूम धुडकावणं हे देखील सोल्जरचं कर्तव्य आहे. पण...........पण जनरल कौल हा त्या दर्जाचा सोल्जर नव्हता.

---

दृष्टीने अत्यंत प्रतिकूल असते. अशा स्थितीत चढाईकरिता बाहेर पडलेल्या जवानांचे नीतिधैर्य (Morale) खचून जाणारच ! कारण, निसंग पुढे जाऊ देत नाही आणि वरिष्ठ लष्करी अधिकारी तर तार स्वरांत हुकूम सोडतील की, "थांवलात काय ! आगे बढो !" भारतीय सैन्यातच बेदिली माजेल. चिन्यांना हेच व्हायला हवे होते आणि झालेही तसेच ! कारण भारतीय जवान जितका शूर आहे तितकाच सीधासाधा आहे. फार वरच्या दर्जाचे राजकारण (Politics) त्याला समजत नाही. आणि एखाद्या वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्याने जर का, त्याला लष्करी दृष्ट्या चुकीचा आणि निरर्थक हुकूम दिला तर जवान वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांवरच रागावतो. सरकारचा वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांना मिळालेला हुकूमच मुळात चुकीचा आहे हे जवानांना 'ऑफिसर्स' सांगू शकत नाहीत. यामुळे झाले काय ? तर चढाईच्या सुरुवातीलाच भारतीय सेनेत आपसातच आरोप–प्रत्यारोप सुरू झाले. चिन्यांचे काम झाले होते. भारताची कुरापत काढून भारत सरकार, भारतीय जनता आणि भारतीय लष्कर यांना प्रक्षोभित करून भारतीय सेनेला घाईगर्दीने पुढे पाऊल टाकायला भाग पाडले आणि चिनी थोडी विश्रांती मिळावी म्हणून तिबेटमधील चिन्यांच्या विहारात परत निघून गेले. इकडे भारतीय सैन्याला हिमालयातून नुसता 'रस्ता काढायला'च असह्य त्रास पडला आणि एवढे करूनही ज्या कामासाठी भारतीय सेना पुढे निघाली होती ते काम अजून व्हायचेच होते. प्रत्यक्ष लढण्यापूर्वीच जवानांची 'ताकद' ही अशी कमी झाली होती. आपण आणखी एक धडा शिकलो की, सरहद्दीवर गडबड झाल्यावर फौज नुसती 'पाठवून' चालत नसते तर आपल्या फौजा सरहद्दीपर्यंत

सहज आणि जलद कशा पोचतील, याची काळजी ' फौजा पाठविण्या 'पूर्वीच घ्यायची असते.

आपल्या भारतीय फौजेपैकी जगविख्यात पायदळ तुकडी क्रमांक ४ (4 th Indian Divison ) ही उत्तर–पूर्व सरहद्दीच्या संरक्षणासाठी पंजाब–आसाम मार्गे पुढे घुसली. या तुकडीतील जवानांचा सरंजाम, सिद्धता आणि उत्तम तयारी होती ती सपाट मैदानी प्रदेशात शत्रूशी समोरासमोर मुकाबला करण्याची. या तुकडी-जवळची यंत्रणा आणि दारूगोळा डोंगराळ प्रदेशात फार उंचीवर जाऊन लढण्याच्या दृष्टीने अयोग्य होता. आपली फार मोठी मनुष्यशक्ती अशी अकारण फुकट घालवली गेली. या तुकडीतल्या अधिकाऱ्यांना आणि जवानांना फार उंचीवर चढून जाण्याची सवय नव्हती. अशा तऱ्हेने केवळ भारत सरकारचा हुकूम अंमलात आणायलाच हवा म्हणून एक चुकीची तुकडी, भलत्याच वेळी आणि भलत्याच ठिकाणी पाठविली गेली.

भारतीय सेनेची आगेकूचही अशा तऱ्हेने, नाइलाज म्हणून सरकारी हुकुमाची अंमलबजावणी करण्याची प्रतिक्रिया ठरली. उदाहरण, म्हणून तुम्हांला १/९ गुरखा रायफल्स या आपल्या तुकडीची हालचाल कशी झाली ते सांगतो. १/९ गुरखा रायफल्स ही तुकडी सिमला–नेफा या मार्गाने पुढे होऊन शेवटी तावांगमध्ये घुसणार होती. सुरुवातीला ही बटालियन दागशाय ( Dagshai ) या अतिशय रम्य आणि उंच ठिकाणी असलेल्या लष्करी छावणीत आणली गेली. ही तुकडी पुढे २ / जाठ या भारतीय सेनेतल्या तुकडीला जाऊन मिळणार होती. पण त्यापूर्वीच १९५९ च्या नोव्हेंबर महिन्यात, एके दिवशी संध्याकाळी लष्कराच्या मेसमध्ये सर्व लष्करी अधिकारी जमलेले असतानाच ब्रिगेड हेड क्वार्टर्सकडून, ऑफिशिएटिंग कमांडिंग ऑफिसरला एक महत्त्वाचा आणि गुप्त लष्करी संदेश पोचवला गेला. हा संदेश घेऊन येणारा अधिकारी सुरुवातीला काहीच सांगायला तयार नव्हता. अखेर २/ जाठ या लष्करी तुकडीचे अधिकारी रात्री बऱ्याच उशिराने मेसमध्ये आल्यानंतर त्याने गौप्यस्फोट केला की ४ थ्या क्रमांकाच्या पायदळ तुकडीला पूर्वीचा मार्ग बदलून नेफामध्ये जाण्याचा हुकूम देण्यात आला आहे. आता हिमालयात बर्फ पडायला सुरुवात झाली होती आणि पुढचे रस्ते बंद झाले होते. प्राप्त परिस्थितीत नेफामध्ये शक्य तितक्या लवकर पोचणे भारतीय सेनेला केवळ अशक्य होते. या ४ थ्या भारतीय पायदळ तुकडीवर कामगिरी सोपवली होती ती भूतानपासून ब्रह्मदेशापर्यंत पसरलेल्या मॅकमोहन रेषेचे संरक्षण करण्याची. किती होते हे अंतर ? ३६० मैल. काय गंमत आहे ! तिथे पुढे सरकायला रस्ते नाहीत, वरून बर्फ पडतोय, आसरा असा कुठेच नाही, तशातच मरणाची थंडी. त्या तुकडीतल्या जवानांचे काय हाल झाले ते फक्त त्यांनाच ठाऊक. नको त्या वेळी दिल्या गेलेल्या या उतावळ्या आणि अविचारी हुकुमाला लष्करी दृष्ट्या काही अर्थ होता का ?

असे असून दिल्लीमध्ये मात्र सरकारी अधिकारी अशा गैरसमजुतीखाली होते की 'आता काय? चिन्यांना रोखण्यासाठी आपण फौजा पाठवल्या आहेत, त्या नक्कीच त्यांचे काम करीत असणार.' दिल्लीत आपल्या वातानुकूलित कार्यालयात बसून नुसते टेबलावर नकाशे उघडून, 'हे नेफा! हे तावांग!' अशी बोटे दाखवणे सोपे आहे. पण असे करणाऱ्या एखाद्या सरकारी अधिकाऱ्याला जर प्रत्यक्ष तिथे जायची कामगिरी दिली असती तर हिवताप भरून अर्ध्या वाटेतूनच तो परत आला असता. सरहद्दीचे संरक्षण असे करतात? लष्करी डावपेच, फसवी योजना, पूर्वतयारी या गोष्टींना काही अर्थ नाही? तशातच आणखी एक अडचण अशी आली की, आघाडीवरचे मुलकी अधिकारी (Civil Authorities) आणि लष्करी अधिकारी यांच्यांत मतैक्य नव्हते. जेव्हा जेव्हा लष्करातली माणसे लष्करासाठी राहण्याची व्यवस्था, जड सामान वाहून नेण्यासाठी लागणारे हमाल, हिमालयात सहज परिवहन करणारी तट्टे इत्यादींची मागणी करण्यासाठी मुलकी अधिकाऱ्यांकडे जात तेव्हा तेव्हा ते बेपर्वाईने वागत आणि अकारण दिरंगाई करीत. जवानांना आवश्यक असलेल्या वस्तू पुरवण्यात मुलकी अधिकाऱ्यांकडून दिरंगाई! काय होणार देशाचे! तुमच्यापैकी अनेकांची अशी गैरसमजूत असेल की लष्करी माणूस म्हटला म्हणजे तो ताडमाड उंच, मिशांचे आकडे वळवणारा, उग्र चेहऱ्याचा आणि २४ तास हातांत बंदूक घेऊन फिरणाराच असला पाहिजे. गैरसमजूत आहे तुमची. आमच्यातदेखील काही काही पात्रे अशी विनोदी असतात की काही विचारू नका. स्वत: गंमत करतात, इतर जवानांना हसवतात. (इतके की प्रत्यक्ष आचार्य अत्र्यांनी त्यांच्या पायावर हात ठेवून सांगावे की "आम्ही हरलो. अशी गंमत गेल्या दहा हजार वर्षांत कुणी केली नसेल!")

आवश्यक त्या वस्तू मुलकी अधिकाऱ्यांकडून दिल्या जात नाहीत, हे पाहिल्याबरोबर आघाडीवरच्या एका गंमतीदार जवानाने काय करावे? तो चक्क मेसमध्ये जाऊन दोन पोळ्या घेऊन आला आणि आपण गेल्या महिन्यात काय काय कामे केली याचा 'मंथली रिपोर्ट' त्याने त्या चपात्यांवर लिहून 'वर' पाठवून दिला. वरिष्ठ लष्करी अधिकारी चिडला आणि त्याने या 'विनोदी' जवानाकडून एक्स्प्लनेशन मागविले. हा पठ्ठाही काही कमी नव्हता. त्याने मेसमध्ये जाऊन आणखी दोन चपात्या आणल्या आणि त्यांवर एक्स्प्लनेशन लिहून दिले की 'आमच्याजवळ कागद नाहीत. जगण्यासाठी, लढण्यासाठी आणि पत्रव्यवहारासाठी आमच्याजवळ असलेली, आम्हांला पुरवली जाणारी एकमेव चीज म्हणजे चपात्या. त्याला आता मी काय करू? दुसऱ्या कशावर लिहून पाठवू शकत होतो मी माझा रिपोर्ट? (I regret the unorthodoxnature of my stationray, but 'chappatii' is the only commodity I have for fighting, for feeding and for futile correspondence.) या अजब प्रकारामुळे खळबळ माजली आणि पुरवठा

करणारे अधिकारी काय समजायचे ते समजले.

आघाडीवर पाठवल्या जाणाऱ्या जवानांची राहण्याची सोय करणे, त्यांना निवाऱ्यासाठी घरे बांधून देणे हे काम मुख्यत: मुलकी अधिकाऱ्यांचे असते. पण तिथेही तीच अडचण. खुद्द तावांगमध्ये जवानांना आसरा देण्यास मुलकी अधिकारी तयार नव्हते. वस्तुत: लष्करी डावपेचाच्या दृष्टीने आणि विमानातून खाली टाकली जाणारी रसद सैन्याला सहज मिळावी या दृष्टीने विचार करता तीच जागा योग्य होती. या बाबतीत लष्करी आणि मुलकी अधिकाऱ्यांच्या बैठका सुरू झाल्या. मुलकी अधिकारी टेबलावर नकाशे उघडून दाखवू लागले की ' तावांगमधली ' ती' जमीन सरकारने बागांसाठी आणि घरांसाठी राखून ठेवली आहे. लष्करी छावण्यांसाठी तुम्ही दुसरी कुठली तरी जागा पाहा. '

आम्हा लष्करी माणसांना फार बोलणे आवडत नाही. ' चर्चा ', ' व्याख्यान ', ' परिसंवाद ', ' वाटाघाटी ', ' संमेलने ' अशा (भयंकर ?) प्रसंगी लष्करी माणसे सहसा हजर नसतात. आमचा खाक्या असा की, लष्करीदृष्टचा माझे म्हणणे बरोबर आहे ना ? मग मला विरोध करणाऱ्या माणसाशी फार चर्चा करीत बसणार नाही. फार फार तर एकदा सांगून बघेन–दोनदा सांगून बघेन–तिसऱ्या वेळी ऐकत नाही असे दिसल्याबरोबर एक ठेवून देईन. ' मुलकी अधिकारी ऐकत नाहीत असे पाहिल्याबरोबर, ' यांच्याशी बोलण्यात काही अर्थ नाही ' असे म्हणून ब्रिगेडियर रणबीर सिंग हा शूर रजपूत संतापाने तिथून जो निघाला तो त्याने निवडलेल्या जमिनीवर जाऊन उभा राहिला. त्याने सरळ त्या ठिकाणी पायदळ तुकडी क्रमांक ४ चे गरुड चिन्हांकित निशाण फडकविले आणि मुलकी अधिकाऱ्यांना ठणकावून सांगितले की ' ही जमीन लष्कराला हवी आहे आणि मी तिचा कबजा घेतला आहे! तुम्हाला काय करायचं ते करा. बघतोच कुणाची हिंमत आहे हे निशाण उपटण्याची ते !" मुलकी अधिकारी काहीतरी विस्कळित पुटपुट करून निघून गेले. जाताना त्यांनी ब्रिगेडियर रणबीर सिंगांकडे ' हा काय माणूस आहे ? का कोण आहे ?' अशा अर्थाने फक्त पाहिले. नशीब एवढेच की G O C 4 Division याने पुढे ब्रिगेडियर रणबीर सिंग यांना पाठिंबा दिला आणि मुलकी अधिकाऱ्यांनी नमते घेऊन कटुता टाळली.

भारतीय सेना नेफामध्ये शिरल्याबरोबर जनरल एस्. पी. थोरात, जनरल ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ, ईस्टर्न कमांड, यांनी पूर्ण विचार करून तिथला प्रदेश कसा आहे, सैन्याला काय अडचणी येतील, कुठला मार्ग कोठून जातो, नेफाच्या संरक्षणासाठी काय डावपेच लष्कराला खेळावे लागतील याचा अत्यंत सुबोध आणि स्पष्ट शब्दांतला अहवाल संरक्षणमंत्र्यांना पाठवून दिला.

मी असे ऐकले की नोव्हेंबर १९६२ मध्ये सध्याचे गृहमंत्री आणि त्या वेळचे संरक्षणमंत्री माननीय श्री. यशवंतराव चव्हाण यांनी जनरल थोरात या कार्यक्षम

आणि लायक जनरलचा हा अहवाल वाचल्यानंतर ते थक्क झाले आणि म्हणाले, "फारच भयंकर घडलं, जनरल थोरातांच्या या महत्त्वाच्या अहवालाकडं आपण दुर्लक्ष करायला नको होतं." आपण ? दुर्लक्ष माननीय श्री. यशवंतराव चव्हाण यांनी केलेले नव्हते. पण किती झाले तरी श्री. यशवन्तराव चव्हाण हे मुरब्बी राजकारणी आणि चतुर बुद्धिवादी आहेत. स्पष्ट नाव ते कसे बरे घेतील ?

प्रथमपासूनच जनरल थोरात यांचे असे मत होते की आघाडीवरची काही ठिकाणे अशी आहेत की तिथेच आपण जास्त लक्ष द्यायला पाहिजे. कारण ती ठिकाणे खात्रीची आहेत. तिथेच नेट धरायला पाहिजे. त्यांनी अचूक आदेश दिला होता की आसामच्या पठाराचे संरक्षण करायचे असेल तर आघाडीच्या 'बोम-दिला' या ठिकाणी लक्ष केंद्रित करा. चिनी सैन्याला भारतात घुसण्यासाठी लष्करी दृष्ट्या योग्य मार्ग एकूण फक्त ३ च आहेत, हा जनरल थोरात यांचा अंदाज इतका तंतोतंत खरा ठरला की, ६२ च्या भारताच्या स्वारीच्या वेळी चिनी त्याच ३ मार्गांनी पुढे आले. केवळ जनरल थोरातच नव्हेत तर नेफा आघाडीवर एकापाठोपाठ पाठवल्या गेलेल्या तिन्ही ब्रिगेडियर्सना हे पटले होते की, आपल्या कुठल्याही तुकडीला " आणखी पुढे जा " असा आदेश देण्यापूर्वी प्रथम बोम-दिला या ठिकाणी आपली संरक्षणव्यवस्था चोख असली पाहिजे. आघाडीवरच्या एखाद्या ठिकाणी आपले पाय आधी घट्ट रोवून घ्यावयाचे आणि ते इतके की शत्रूच्या बापाचा बाप खाली आला तरी आपले हे ठिकाण जाणे शक्य नाही, अशी खात्री झाली पाहिजे. एकदा का, अशी खात्री पटली की, मग त्याच्यापुढचे ठिकाण याप्रमाणेच कसे भक्कम रीतीने लढवता येईल याचा विचार करायचा. 'सैन्य चालले पुढे' याचा अर्थ हा असा आहे. कुठल्याच आघाडीवरच्या ठिकाणावर शक्ती केंद्रित न करता एखाद्या राष्ट्राचे सैन्य, सैन्य चालले पुढे याचा भलताच अर्थ घेऊन–जर का नुसतेच पुढे जायला लागले तर त्यांना अचानक मागे पळत सुटावे लागेल आणि मागे पळताना दोन्ही अर्थांनी भुई 'थोडी' होईल. युद्ध हेदेखील एक शास्त्र आहे. सर्वसामान्य माणसांच्या लढण्याच्या कल्पना अगदीच बालिश असतात आणि म्हणूनच 'इंच इंच लढवू !' म्हणताना त्यांना असे वाटते की भारतीय सेना संरक्षणासाठी पुढे जाणार याचा अर्थ शेकडो मैल लांबीच्या मॅकमोहन रेषेच्या प्रत्येक इंचावर जवान उभे राहून सांगणार की "इथून आता आम्ही एक इंचदेखील मागे जाणार नाही." तुमच्या माहितीकरिता म्हणून सांगतो की, मॅकमोहन रेषा ही भारताची राजकीय सरहद्द आहे. पण राजकीय सरहद्दीप्रमाणेच लष्करी सरहद्ददेखील असते आणि राजकीय सरहद्द व लष्करी सरहद्द यांचा सहसा मेळ बसत नाही. आघाडीवरची जी ठिकाणे अशी असतात की, ती पडली तर शत्रूला आपल्या देशात मुक्त प्रवेश मिळतो, ती ठिकाणे म्हणजे लष्करी सरहद्द.

......आणि म्हणूनच जनरल थोरात या थोर जनरलने फक्त एक लहानशी

तुकडी तावांगमध्ये पाठवली आणि उरलेली सबंध बटालिन बोम-दिला या लष्करी सरहद्दीच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठिकाणी आणून ठेवली. एवढेच नव्हे तर त्या बटालियनच्या मागे एक सबंध ब्रिगेड उभी केली. जनरल थोरातांचे कुठेही चुकत नव्हते. कारण त्यांनी अचूक निर्णय घेतला होता की, 'काहीही करून बोम-दिला सांभाळले पाहिजे.'

अर्थात मी असे म्हणत नाही की, देशाच्या राजकीय सरहद्दीकडे दुर्लक्ष करावे. राजकीय सरहद्दीवर ती जमीन आमची आहे, आमच्या 'कवजात' आहे असे म्हणता यावे यासाठी चौक्या बांधाव्यात. राजकीय सरहद्दीवर बावटे लावावेत, पण युद्ध-शास्त्र मात्र हेच सांगेल की, बावटे लावलेली ठिकाणे लढवायला जाऊ नका. शक्ती केंद्रित करायची ती लष्करी सरहद्दीवर. लष्करी सरहद्दीवर शत्रूला थांबवले की त्याची पिछेहाट सुरू होते. शत्रूला पुन्हा आणखी मागे रेटून आपल्या देशाच्या राजकीय सरहद्दीच्या पलीकडे घालवायचा आणि पुन्हा राजकीय सरहद्दीवर बावटे रोवून जगाला दाखवून द्यायचे की, आमच्या देशाची सरहद्द इथपर्यंत पोचते. स्पष्ट शब्दांत आणि थोडक्यात सांगायचे तर जनरल थोरात यांची योजना अशी होती की, चिनी सैन्याला सुरुवातीला भारताच्या राजकीय सरहद्दीपासून बरेच आत येऊ द्या आणि आपल्या लष्करी सरहद्दीपर्यंत ते येऊन पोचले की जोराचा प्रतिहल्ला करून चिन्यांना मागे रेटू या.

युद्धशास्त्र म्हणून जनरल थोरात यांची योजनाच अचूक होती. पण ते भारत सरकारला कळायला हवे होते ना! भारत सरकारला जनरल थोरात यांची ही योजना पसंत नव्हती. सरकारचे म्हणणे असे होते की सबंध मॅकमोहन रेषेचेच संरक्षण करा. भारत सरकारचा असा गोंधळ का झाला याचा उलगडा अगदी अली-कडे—नोव्हेंबर १९६७ मध्ये-कृष्णमेनन यांनी केला. 'स्नेहसमन' या पत्राच्या इंद्र मलहोत्रा यांच्याशी झालेल्या बोलण्यात कृष्णमेनन म्हणाले, "लढाईच्या सुरुवाती-लाच चिन्यांना भारतीय हद्दीत आत घेतलं असतं तर बरं झालं असतं. आपल्याला प्रतिहल्ला करणं सोपं गेलं असतं. पण आपल्या देशातल्या जनतेला त्यामागचा लष्करी डाव समजावून देणं केवळ अशक्य होतं. लोक त्या वेळी इतके चिडले होते—लोकमत इतकं प्रक्षुब्ध झालं होतं—की त्याचा फायदा भारतातल्या राजकीय पक्षांनी आणि परराष्ट्रातल्या प्रचारकांनी उठवला असता. भारतीय जनता आणखीनच चिडली असती; कारण बातमी अशी छापली गेली असती की चीनने मॅकमोहन रेषा ओलां-डली. त्या वेळी परिस्थितीच अशी होती की, कुठलाही संरक्षण मंत्री किंवा पंत-प्रधान सुरुवातीला चीनला आत येऊ देण्याचा लष्करी दृष्ट्या अतिशय योग्य असलेला निर्णय अंमलात आणण्यापासून दूर राहिला असता."

लष्करी तज्ज्ञांनी वेळोवेळी दिलेल्या अहवालांचा आणि योजलेल्या लष्करी डाव-पेचांचा सूक्ष्म अभ्यास मेननसाहेबांनी खरोखरच केला होता तर! कृष्णमेनन

यांचा हा धाडसी कबुलीजबाब पाहिला की देशाच्या नेत्यांची जबाबदारी कोणती असते, असा प्रश्न पडतो. देशाच्या हितासाठी लष्करी अधिकारी जी योजना आखतील ती नेत्याने अंमलात आणायची की " असं केलं तर लोक रागावतील ' या क्षुल्लक सबबीखाली देश संकटात लोटायचा ? भारतासारख्या देशात तर जनतेचे मत अजमावणे फारच कठीण आहे. लोकसभेतल्या विरोधी पक्षांच्या खासदारांनी चिन्यांना सरकारने आत येऊ दिले याचे भांडवल केले असते हे मेननसाहेबांचे म्हणणे थोडे खरे आहे. पण काही मूठभर खासदारांची अस्वस्थता-त्यांचा संताप, म्हणजे जनतेचा प्रक्षोभ नव्हे.

संरक्षणमंत्री या नात्याने मेनन यांना भारतीय लष्करी अधिकाऱ्यांचा हा पवित्रा चांगलाच समजला होता. २३ एप्रिल १९६० ला मेननसाहेब म्हणाले होते, " हिमालयासारख्या उंच, विकट प्रदेशात लढण्याची भारताची इच्छा नाही. पण जर का हिमालय पर्वत ओलांडून थेट खाली पठारावर येण्याचा चिन्यांचा हेतू असेल तर चीनने जरूर उतरून बघावेच. सपाट प्रदेशात भारतीय सेना अशी तुटून पडेल की प्रत्येक खाली आलेला चिनी सैनिक अक्षरशः वर जाईल ! " संरक्षणमंत्र्यांचे हे उद्गार म्हणजे १०० टक्के सत्य आहे. हे त्यांचे उद्गार फसवे नव्हते, त्यात ढोंग नव्हते. लष्करी दृष्टचा विचार केला तर हे खरे होते की, हिमालय पर्वत उतरून चिनी सैन्य खाली उतरले असते तर चिन्यांचा भारतीय सेनेने फडशा पाडला असता. संरक्षणमंत्री व्ही. के. कृष्णमेनन यांच्यावर कुणी जरी कुठलाही आरोप केला तरी एक गोष्ट निर्विवाद मान्य करावीच लागेल, की कृष्णमेनन ही असामान्य आणि




अलौकिक बुद्धिमत्ता असलेली व्यक्ती आहे. आणि म्हणूनच प्रश्न पडतो, की अशा अचाट बुद्धिमत्तेच्या व्यक्तीने जनतेला विश्वासात घेऊन, भारतीय सेना हिमालय पर्वत ओलांडून जर का चिनी सेनेसमोर गेली तर आपल्यालाच धोका आहे, ही गोष्ट जनतेला का समजावून सांगितली नाही ? आणि वस्तुस्थिती जर का इतकी स्पष्ट होती तर आपले ज नेते भारतीय जनतेला पुन्हा पुन्हा आश्वासन देत होते की, ' काळजी करू नका. आपली तयारी उत्तम आहे ' त्यांना मेननसाहेबांनी वेळीच का दटावले नाही ? का नाही त्यांनी सत्य उघडकीस आणले ? ' माझ्या हातून चुकून ती गोष्ट घडली ' असा बचाव अति बुद्धिमान माणसाला कधीही घेता येत नाही. माझे स्वत:चे मत विचाराल तर मेननसाहेब समजतात तितकी भारतीय जनता वेंधळी नाही. जवानांवर जनतेचा पूर्ण विश्वास आहे. आठवतंय तुम्हांला १९६५ मध्ये भारत–पाकिस्तान युद्ध चालू होते आणि त्याच वेळी चिनी सैन्याने थांग-ला रीज विभागात मॅकमोहन रेषा ओलांडली अशी बातमी आली.भारतीय जनता बिलकुल डगमगली नाही. 'चिनी आले ! चिनी आले !' असा धसका घेऊन कुणीही गडबड–गोंधळ माजवला नाही. मोठे लोक राहू द्यात बाजूला. चाळी–चाळीतली लहान लहान पोरेसुद्धा आपल्या जवानांवर बेहद्द खूष ! सर्वांच्या उत्साहाला उधाण आले होते. भारतीय जनता समजून चुकली होती की, पाकिस्तान मार खात आहे. त्यांचा तो सुप्रसिद्ध पॅटन रणगाडा शूर भारतीय जवान कुप्रसिद्ध करून टाकीत आहेत. पाकिस्तानचे पॅटन रणगाडे पुढे येताहेत ? नॉनसेन्स ! ते रणगाडे जागच्या जागी निकामी होत आहेत किंवा मागे जात आहेत ! पुढे जाते ते फक्त भारतीय सैन्य ! जवानांच्या शौर्यावर जनतेचा पूर्ण विश्वास होता. आपल्यावर दबाव आणण्यासाठी चिनी पुढे येताहेत ना ? येऊ देत ! त्यांना काय घाबरायचे ? जरा थांबा ! आमचा ' जवान ' पाकिस्तानला मरेमरेस्तोवर ठोकून काढील आणि मग चिन्यांनाच ' भेटायला ' जाईल हा जनतेचा विश्वास होता. भारतीय जनतेने त्या वेळी अपूर्व त्याग केला. पुरुषांनी जवानांसाठी पैशांचा पाऊस पाडला. भगिनींनी जवानांसाठी स्वेटर विणले, पोळ्या लाटल्या, कुणी न सांगताच. मेननसाहेब, अशी आहे भारतीय जनता. सप्टेंबर १९६२ मध्ये नाथू-ला खिंडीतून चिनी सैनिक पुढे आले. आपल्या जवानांनी ' ठोशास ठोसा ' या जिद्दीने त्यांना प्रत्युत्तर दिले आणि आमच्याही मनगटात जोर आहे हे चीनला दाखवून दिले. चिनी समजले की अशी लढाई जमायची नाही. झुंडीच्या झुंडी पाठवाव्या लागतील. पण मुद्दा असा की ह्या वेळी भारतीय जनता गोंधळली नाही. ' लोक रागावतील, जनता प्रक्षुब्ध होईल' या सबबी अगदीच लंगड्या आहेत. युद्ध हे नेहमी लष्करी अधिकारी जे डावपेच ठरवतील त्याप्रमाणेच झाले पाहिजे. जनरल थोरात यांना भारत सरकारने वेळो-वेळी विरोध केला आणि शेवटी जनरल थोरात यांचा लष्करी डावपेचच बरोबर होता. त्यांचे ऐकले असते तर बरे झाले असते हे सत्य बाहेर पडल्यावरोबर मेननसाहेब

जनतेला पुढे करून सांगत होते की जनरल थोरातांचा डावपेच बरोबर होता. चिन्यांना अगोदर थोडे आत घेऊन मग मागे रेटणे अधिक सोपे होते. पण काय करणार? चिनी आत आले नाहीत, त्यांना मुद्दामच येऊ दिलेले आहे. हा लष्करी डावपेच जनतेला (!) जर का कळला नाही तर? जनता प्रक्षुब्ध होईल. सरकार ठिकाणावर राहणार नाही. सरकार आधी, राष्ट्र नंतर! आहात कुठे! आणि म्हणून १९६२ पर्यंत आपल्या सरकारचे संरक्षणविषयक धोरण असे होते की, सरहद्दीवरच लहान लहान चौक्या उभारायच्या. त्या संरक्षक चौक्यांचे तरी संरक्षण होण्याइतकी सेना सरहद्दीवर होती का? याचा विचारच नाही. भारत सरकार लोकसभेत आणि जनतेला सांगायला मोकळे की 'काळजी करू नका. सरहद्दीवर सैन्य 'पाठवलेलं' आहे. किती सैन्य? कुठं पाठवलंय?' हे सगळे अंधारात. खासदार आणि जनता तर खूष झाली ना? मग आपल्या सरकारला धोका नाही. आपण पुन्हा एकदा 'प्रचंड बहुमता'ने निवडून येऊ.

भारत सरकारचा हा असा बौद्धिक खेळखंडोबा होण्याचे कारण असे की, आपल्या देशाच्या नेत्यांना युद्धशास्त्राचे ज्ञान अजिबात नसते. जगातल्या लढायांचे इतिहास त्यांनी अभ्यासलेले – अभ्यास सोडून द्या – नुसते वाचलेलेदेखील नसतात. आपल्या लष्करात युद्ध म्हणजे काय, हे जाणणारे जे सेनापती आहेत, त्यांचे आपण ऐकावे अशी नम्रता आणि लीनतादेखील नेत्यांमध्ये नसते. आपल्याला एखाद्या विषयात काही कळत नाही एवढे कळले तरी पुष्कळ असते. जगामध्ये भारत हे एकच राष्ट्र असे आहे की जिथे राजकारणाच्या उलाढाली करणाऱ्या व्यक्तींना (नेता म्हणा वाटले तर!) लढाईच्या तंत्राची माहिती नसते. 'स्टेटस्मन' या इंग्रजी पत्राच्या एका पत्रलेखकाने मागेच असे प्रसिद्ध केले होते की, 'भारतात लष्कर आणि जनता यांच्यांत फार मोठी पोकळी आहे. कारण, लष्कर आणि जनता यांना एकत्र आणणारे जे भारत सरकार त्या भारताच्या संरक्षण मंत्र्याला आणि परराष्ट्र मंत्र्याला 'लढाई' या विषयाचे कवडीचेसुद्धा ज्ञान नाही आणि त्यांना शिकायची इच्छाही नाही. त्यांचा रुबाब मात्र नबाबाचा आहे.'

(They Know nothing of military affairs and are not prepared to learn.)

लढाई म्हटली म्हणजे शत्रुपक्षाच्या सैन्याची हानी करणे हा विजयाचा पहिला टप्पा असतो. शत्रूची ताकद कमी करणे म्हणजेच आपली वाढवणे. जनतेला शांत करण्यासाठी 'काहीतरी' करणे म्हणजे 'लढाई' नव्हे. लढाई जिंकायची असेल तर एकदम सरहद्दीपर्यंत शत्रूला सामोरे न जाता प्रथम शत्रुसैन्याला आत येऊ द्यावे आणि मग परिस्थिती आपल्याला अनुकूल झाली की आत आलेल्या शत्रूला चिरडावे हे लढाई जिंकण्याचे एक यशस्वी तंत्र आहे. देऊ उदाहरण तुम्हांला? इ. स. १८१२ मध्ये नेपोलियनने आणि १९४१ मध्ये प्रत्यक्ष हिटलरने रशियावर

आक्रमण केले. 'हिटलर आला ! नाझी जर्मन फौजा आपल्या देशात घुसल्या ! ' एवढी बातमी कळायचीच खोटी की जगातल्या राष्ट्रांचा थरकाप होत असे. पण रशियाचा त्या वेळचा सर्वाधिकारी लढाई म्हणजे काय ते जाणत होता. त्याने रशियन फौजांना हळूच 'गोष्टी सांगेन युक्तीच्या चार' या धर्तीवर हुकूम फर्मावला की, "जर्मन आले ? घाबरू नका ! त्यांना 'आत घ्या ! ' येऊ देत किती आत येताहेत तेवढे. मी सांगेन तेव्हा प्रतिहल्ला करा आणि बघा काय होतं ते ! " आणि काय झाले ? जर्मन फौजा रशियन प्रदेशात खूप आत गेल्या. घुसल्या. जानेवारी–फेब्रुवारी महिने उजाडले. आणि रशियन सेनेला 'वरून' हुकूम सुटला की, 'आता प्रतिहल्ला चढवा.' का ? कारण जानेवारी–फेब्रुवारीमध्ये रशियात बर्फ पडते. सरहद्दीच्या प्रदेशात तर चिखलाचा समुद्र पसरतो. 'आत आलेल्या' शत्रूला हे ठाऊक नसते. मागचा 'दरवाजा' बंद आणि पुढून ताजेतवाने रशियन सैन्याचे तुफानी हल्ले. एक तर मेले पाहिजे किंवा चिखल तुडवीत मागे पळाले पाहिजे. दुसरा मार्ग नाही. रशियाने नेपोलियनला असे पळवले आणि हिटलरलादेखील त्याच मार्गाने परतवले. नाझी जर्मन फौजांची रशियाने दाणादाण केली. कशी ? भौगोलिक परिस्थितीवर अवलंबून राहून आणि म्हणूनच जानेवारी–फेब्रुवारी या दोन महिन्यांना रशियात जनरल जानेवारी आणि जनरल फेब्रुवारी असे म्हणतात.

दुसरे उदाहरण देऊ ? १९४४ मध्ये भारतावर ब्रिटिशांचे राज्य होते. पायदळ तुकडी क्रमांक १४ चा कमांडर होता फील्ड मार्शल सर विल्यम स्लीम आणि अचानक ब्रह्मदेशामधून भारतामध्ये जपानी फौजा घुसल्या. कमांडर स्लीमने लष्करी दृष्ट्या विचार केला की आता काय करू ? जपान्यांना समोरा जाऊ ? की त्यांना 'आत घेऊ ?' शेवटी कमांडर स्लीमने लष्करी दृष्टीने असा विचार केला की 'त्यांना' आत घेतलेलेच बरे. मरतील लेकाचे योग्य वेळी. आणि कमांडर विल्यम स्लीमने ब्रिटिश-इंडियन फौजांना हुकूम दिला की आपल्याच हद्दीत कोहिमापर्यंत मागे या. जपान्यांना आत येऊ द्या. आणि हा अजब हुकूम पाहून एक चमत्कार घडला. ब्रिटिश सरकारने फील्ड मार्शल विल्यम स्लीमले फैलावर घेतला. त्याला खडसावून विचारले की "अरे ! काय करतोस तू हे ? तुला माहीत नाही ? हे इंडियन्स म्हणजे मूर्ख आहेत. जपानी सेना जरा जरी 'आत' आली तरी 'जपानी आले, जपानी आले' असा आरडाओरडा करीत गोंधळ माजवतील. ब्रिटिश सरकार ठिकाणावर राहणार नाही." आणि फील्ड मार्शल विल्यम स्लीमने ब्रिटिश सरकारला सणसणीत लेखी जवाब दिला की, "हे पाहा ! ब्रिटिश इंडियावर जपानने हल्ला केलेला आहे. आता लढाई करायची का नाही करायची हे ठरवणे एवढेच फक्त सरकारचे काम आहे. पण जर का लढाई करायचीच असे ठरवलेत तर कशी करायची ते माझ्यावर सोपवा. मी फील्ड मार्शल आहे, हजाम नव्हे. भारतीय जनता आणि ब्रिटिश सरकार यांचा युद्धाच्या डावपेचांशी काहीही संबंध नाही." (मेनन

साहेब ! तुम्ही हा इतिहास वाचला असतात तर ! ) आणि अहो आश्चर्यम् ! 'साहेब' आपल्यापेक्षा शहाणा निघाला. ब्रिटिश सरकारने फील्ड मार्शल विल्यम स्लीमला कळवले की, "तुझे बरोबर आहे. लढाई तर करायचीच. सरकारतर्फे तुम्हांला फक्त एवढेच कळविण्यात येत आहे की इथून पुढे लढाई कशी करायची, ते फक्त तुम्ही ठरवा, सरकार ढवळाढवळ करणार नाही." आणि काय झाले ? ब्रिटिश-इंडियन फौजा कोहिमापर्यंत मागे आल्या. जपानी फौजांचा कमांडर अडचणीत आला. त्याला वाटले होते ब्रिटिश-इंडियन फौजा पुढे येतील. पण भलतेच झाले. जपानी फौजांना रसद पुरवणे कठीण होऊन बसले. आणि नंतर पावसाळा सुरू झाला. फील्ड मार्शल विल्यम स्लीमने ब्रिटिश इंडियन फौजांना हुकूम दिला की "आता हा मोका चांगला आहे. पाऊस पडतोय. सरहद्दीवर चिखल झालाय. तशातच फारच आत आल्यामुळे जपान्यांना अन्नपुरवठा व्यवस्थित होत नाही. ते भुकेलेले आहेत. आता त्यांना ठोका !" ताज्यातवान्या ब्रिटिश-इंडियन फौजा पुढे घुसल्या. 'आत आलेले' जपानी मेले. आणि ब्रिटनने जी धडक मारली ती रंगूनपर्यंत. १९४५ च्या मे महिन्यात रंगून पडले. प्रत्यक्ष ब्रह्मदेशात 'युनियन जॅक' फडकला. जनरल थोरात हेच सांगत होते. 'आधी चिन्यांना आत घ्या आणि मग ठोका.' पण दुर्दैव या देशाचे की भारत सरकारने जनरल थोरातांसारख्या थोर जनरलची उपेक्षाच केली.

केवळ जनरल थोरातच नव्हेत ब्रिगेडियर थॉमसनसुद्धा याच मताचे होते, की तिबेटमध्ये चिन्यांनी चांगले रस्ते बांधले आहेत. चिनी सैन्य झुंडीने कितीही येऊ शकेल. एकदम सरहद्दीवर जाऊन लढण्यात काय अर्थ आहे ? काय हा भारत सरकारचा अविचार ! लढाई जिंकायची आहे ना ? मग चीनचा रस्ता तोडा. चिन्यांना आत घ्या आणि बर्फ पडायला लागेल तेव्हा प्रतिहल्ला करा. चिन्यांची पंचाईत होईल. मागचा रस्ता बंद आणि पुढून भारतीय जवानांचे तुफानी हल्ले. एक चिनी जिवंत राहणार नाही.

लष्करी डावपेचांचे हे व्याख्यान मी आता आटोपते घेतो. कारण सांगावे तेवढे थोडे आहे आणि आता हे दाखवतो की, चिनी सैन्याला किती सोपं होतं हे भारत-चीन युद्ध ? चीनला हे ठाऊक होते की भारत सरकार तिबेटला चीनचा भाग मानते. एखाद्या मंदिरात मुसलमान किंवा मशिदीत हिंदू अचानक घुसेल ? शक्य नाही. भारत तिबेटमध्ये घुसणं केवळ अशक्य होते. तेवढा दम या बावळट भारत सरकारमध्ये नाही हे चीनला ठाऊक होते. म्हणून तिबेट-भारत सरहद्दीच्या संरक्षणासाठी चीनने उगाच मनुष्यशक्ती खर्च केली नाही. कारण त्यांना ठाऊक होते की दुर्गम पहाडी प्रदेशात एक चिनी सैनिक दिवसांतून दोन वेळ पोसणे म्हणजे खर्च आहे. भारत तर हल्ला करणे शक्य नाही. मग कशाला उगाच आपल्या चिनी सैन्याला त्रास द्यावयाचा ? त्यांना आराम करू द्या. म्हणजे हुकूम होईल तेव्हा ते

चांगले लढू शकतील. याउलट आपल्या भारत सरकारने असे ठरवले होते की मॅकमोहन रेषेपर्यंतच सेना पुढे पाठवायची. तिबेटमध्ये घुसायचे नाही. तिबेटमध्ये घुसल्याशिवाय मॅकमोहन रेषेचे संरक्षण कसे होऊ शकणार होते ? प्रथम नोव्हेंबर १९६१ मध्ये आणि नंतर ३ ऑक्टोबर १९६२ ला चिनी पंतप्रधान चाऊ-एन्-लाय यांनी स्पष्ट इशारा भारत सरकारला दिला होता की, मॅकमोहन रेषा आम्ही जुमानीत नाही. नेफा हा प्रदेशदेखील चीनचाच आहे. त्याचा परिणाम असा होणार होता की चिनी फौजा ताबडतोब नेफामध्ये घुसल्या असत्या तरी जगातल्या कुठल्याही राष्ट्राने 'चीनने भारतावर आक्रमण केलं' असे म्हटले नसते. कारण नेफा हा प्रदेश चिनी पंतप्रधानाने 'वादग्रस्त' करून टाकला होता. (Disputed Area)

भारतीय जनतेला आणि भारतीय नेत्यांना यात खूप शिकण्यासारखं आहे. जरा चिनी आत घुसले की लगेच 'बदला घ्या. सूड घ्या !' असा आरडाओरडा करता तो लष्करी दृष्टया निरुपयोगी आहे. असे राष्ट्रभक्तीचे नुसते झटके येऊन चालत नाही. चिनी प्रत्यक्ष घुसण्यापूर्वीच चीनने प्रथम वातावरण निर्माण केले. भारत सरकार आणि भारतीय जनतेने असा आरडाओरडा करायला हवा होता की, 'तिबेटसुद्धा आमचाच आहे.' म्हणजे तिबेटच वादग्रस्त टापू झाला असता. नेफा वाचले असते. 'चिन्यांना हुकलून द्या' अशी भलतीच घोषणा स्वयंपाकघरात बायकोजवळ बसून (!) करू नका. प्रथम युद्धशास्त्राचा अभ्यास करा म्हणजे लक्षात येईल की आता चिन्यांना हाकलायला वेळ लागेल. लष्करी दृष्टया परिस्थिती अनुकूल करून घ्यावी लागेल. त्यासाठी प्रथम प्रत्येक भारतीय माणसाच्या नसानसात राष्ट्रवाद भिनला पाहिजे. एरवी सिनेमाचे तिकिटसुद्धा काळचा बाजाराने घ्यायचे. सुळसुळीत शर्ट घालायचे. सबंध दिवस विचार करावयाचा तो फक्त 'मी, माझी बायको, माझी मुलं, माझे पैसे' याच गोष्टींचा आणि चिनी आत घुसले असं 'पेपरात' वाचलं आणि रेडिओवर "इंच इंच लढवू ऽऽ !" हे गाणे लागले (तुमच्या भाषेत) की घरात बसून हाताच्या मुठी वळायच्या याला राष्ट्रवाद म्हणत नाहीत. अजून वेळ गेलेली नाही. तुमच्यापैकी प्रत्येकाने धर्म-जात-पंथ-पक्ष-पैसा हे सर्व विसरून फक्त राष्ट्र मानले तर एक दिवस असा येईल की भारतीय सेना पेकिंगपर्यंत धडक मारील. लढाई चालू असो किंवा नसो. दैनंदिन जीवनाच्या प्रत्येक व्यवहारात 'राष्ट्र' लक्षात असू द्या. 'काशीस जावे नित्य वदावे' असे का म्हणतात ? कारण तसे म्हटलं तर खरोखरच काशीयात्रा घडते. रावळपिंडी आमची आहे. कराची ? आमचीच. पेकिंग ? ते तर नक्कीच आमचे. असे म्हणत राहा. त्यागाची तयारी ठेवा आणि मग बघा काय होईल ते.

या देशाचे भाग्य थोर की जनरल थिमय्या आणि जनरल थोरात यांच्यासारखे जनरल्स भारतीय सैन्यात होते. त्या दोघांच्या हातात सत्ता असेपर्यंत मागचा पुढचा विचार करून दोघांनी असा हट्ट धरला, की बोम-दिलाच्या पुढे भारतीय सेना पाठव-

णार नाही. कारण युद्धशास्त्रात पुढे जायचे तर मागेदेखील भरपूर 'मिलिटरी' जय्यत तयार ठेवावी लागते. हे त्या दोघांना ठाऊक होते. जनरल थिमय्या आणि जनरल थोरात यांचे भारत सरकारशी हे असे वाकडे आले. भारत सरकारच्या फॉरवर्ड पॉलिसी (!) ला या दोघा अनुभवी जनरलसचा सक्त विरोध होता. जनरल थिमय्या आणि जनरल थोरात भारत सरकारला पुन्हा पुन्हा सांगत होते की, "कृपा करून राष्ट्रवाद आणि लढाई यांविषयी तुम्ही आम्हांला शिकवू नका. कारण ते दोन्ही विषय तुमचे नव्हेत." त्यावर काय झाले? जनरल थोरात आणि जनरल थिमय्या यांचे ऐकले भारत सरकारने? छे: छे: उलट भारत सरकारने त्यांच्यावर दात धरला आणि ठरवले की हे दोघेही 'म्हातारे' (!) जनरल्स सेवानिवृत्त झाले की आपण सांगू ते ऐकणारा एखादा तरणाबांड जनरल त्यांच्या जागी आणला पाहिजे. 'दि बॅटल ऑफ नेफा' पुस्तकाचे लेखक श्री. जी. एस्. भार्गव लिहितात की, "सप्टेंबर–ऑक्टोबर १९६२च्या विपत्तीत देश धोक्यात आला. कारण प्रत्यक्ष भारतीय सेनेतच 'आर्मी ऑफिसर्स'ची अशी एक नवी जात पैदा झाली होती की ज्यांना राजकीय नेत्यांबद्दलच जास्त आकर्षण आणि जवळीक वाटू लागली होती. भारत सरकारला लढाई हा विषय वर्ज्यच होता. निदान लष्करात असलेल्या माणसाच्या–आर्मी ऑफिसर म्हणवून घेणाऱ्या माणसाच्या–रक्ताच्या थेंबा-थेंबात आणि डोक्यातदेखील राष्ट्रवाद असला पाहिजे याचा या नव्या जातीला विसर पडला होता. लष्करात प्रमोशन मिळवायचे तर मिनिस्टर आपला दोस्त असला पाहिजे, ही त्यांची विचारसरणी होती."




या नव्या आर्मी ऑफिसर्सना अशी इच्छा होत नव्हती की, एकदा जनरल थिमय्या, जनरल थोरात यांच्याबरोबर आपला फोटो काढून घ्यावा की जो नुसता बघूनच कुणाचाही ऊर अभिमानाने भरून यावा. त्यांची धडपड चालली होती ती ही की पंडित जवाहरलाल नेहरूंनी आपल्या खांद्यावर हात ठेवलेला आहे, ते आपल्याशी बोलताहेत असा फोटो केव्हा येईल ? की जो बघून लोक असे म्हणतील की "कमाल आहे! पंडित नेहरूंना जवळून बघायचेसुद्धा भाग्य आम्हांला लाभत नाही आणि इथे तर प्रत्यक्ष नेहरू तुझ्या खांद्यावर हात ठेवून तुझ्याशी बोलताहेत ! म्हणजे तू फारच मोठा ऑफिसर आहेस ! "

अशा परिस्थितीत असा एक हुशार जनरल निघाला की, ज्याची फक्त प्रमोशनवर नजर होती. व्यक्तिगत ध्येयवाद जबरदस्त होता. महत्त्वाकांक्षा, हेवा वाटण्यासारखी होती – जनरल बी. एम. कौल ! आता सांगतोच त्यांची अनटोल्ट स्टोरी !

'पोझिशनल वॉरफेअर' हा जनरल कौल यांचा अत्यंत आवडता शब्द होता. 'पोझिशनल वॉरफेअर' म्हणजे काय ? तर प्रत्यक्ष सरहद्दीपर्यंत जाऊन तिथे संरक्षण चौक्या बांधायच्या (Border Posts) म्हणजे चिनी पुढे येणार नाहीत. यालाच भारत सरकार म्हणत होते फॉरवर्ड पॉलिसी.

सापडला. भारत सरकारला असा जनरल सापडला की, जो भारत सरकारचे ऐकेल. लोकसभेत सरकार सांगायला मोकळे की, " चिंता करू नका. सरहद्दीवर आम्ही सैन्य पाठवलंय. " नाहीतर ते जनरल थिमय्या आणि जनरल थोरात ! ते सरळ सरळ सांगतात की आपल्याजवळ पुरेशी मिलिटरी नाही, पुढे जाऊ नका ! असे कुठे खरे बोलतात ? त्यांचे ऐकले तर जनतेला आम्ही काय सांगायचे ? त्यापेक्षा ते दोघे नकोतच. भारत सरकारचे सुदैव (?) आणि देशाचे दुर्दैव असे. लवकरच जनरल थिमय्या आणि जनरल थोरात सेवानिवृत्त झाले.

या अजब फॉरवर्ड पॉलिसीची मूळ कल्पना कोणाची याबद्दल सध्या वादंग माजलंय. कारण या फॉरवर्ड पॉलिसीची चिन्यांनी हां हां म्हणता धुळधाण केली. भारताची अब्रू घेतली. आता भारत सरकारला आतून पटलंय 'जनरल थोरातच बरोबर होते. आपली फॉरवर्ड पॉलिसी चुकलीच ! '

जनरल कौल या चुकीच्या फॉरवर्ड पॉलिसीची जबाबदारी पंडित नेहरूंवर टाकतात. जनरल कौल लिहितात, " त्या वेळी पंडित नेहरूंवर लोकसभेत कडवट भाषेत हल्ले होत होते. यातून काहीतरी मार्ग काढायला पंडित नेहरू उत्सुक होते. खवळलेल्या भारतीय जनतेला शांत करण्यासाठी नेहरूंनी फॉरवर्ड पॉलिसी स्वीकारली. "

असे म्हणतात की १९६१ च्या हिवाळ्यात पंडित नेहरूंनी आपल्या चेंबरमध्ये लष्करी अधिकाऱ्यांची एक सभा घेतली. या सभेला संरक्षणमंत्री व्ही. के. कृष्णमेनन, जनरल थापर आणि जनरल कौल हजर होते. पंडितजींनी त्यांच्या टेबलावर

असलेल्या नकाशावर बोट ठेवून सांगितले की, "सरहद्दीवर पुढे होऊन संरक्षक चौक्या बांधायला काय हरकत आहे? कारण त्यामुळे त्या प्रदेशावर कबजा भारताचा आहे हे सिद्ध होईल. (Possession was nine – tenths of the Law) चिनी जर का वादग्रस्त टापूत चौक्या उभारू शकतात तर तसे आपण का करू शकत नाही? या बाबतीत चीनशी आपण स्पर्धा करावी आणि सरहद्दीवर आपली ठाणी निर्माण करावीत. चिनी त्यामुळे फार फार तर चिडतील पण प्रत्यक्ष भारतावर चीन हल्ला करणार नाहीत. (China was unlikely to wage war with India.)"

जनरल कौल पुढे लिहितात की, "त्याच सभेत मी पंडित नेहरूंना सांगितलं की, सरहद्दीवर अशा चौक्या बांधणं आणि ठाणी निर्माण करणं धोक्याचं आहे. कारण चीन ती ठाणी टिकू देणार नाही. नुसत्या संख्येनंच नव्हे तर शस्त्रास्त्रांनीसुद्धा चीन आपल्यापेक्षा प्रबळ आहे."

वादापुरतं असं धरून चालू की जनरल कौलनी तसा स्पष्ट आणि लष्करी दृष्टचा खरा असलेला सल्ला पंडित नेहरूंना दिला होता. जनरल कौल असा निष्कर्ष करतात की, "लोकसभेतल्या आपल्या टीकाकारांना व जनतेला शांत करण्यासाठीच ही फॉरवर्ड पॉलिसी पंडित नेहरूंनी निर्माण केली."

माझ्या मते फॉरवर्ड पॉलिसीची जबाबदारी फक्त पंडित नेहरूंवर टाकणे म्हणजे त्यांच्यावर अन्याय करण्यासारखे आहे. काहीही तयारी नसताना आयत्या वेळी धिसाडधाई करणारी पंडित नेहरू ही व्यक्ती नव्हती. त्यांना तसा सल्ला कुठल्यातरी जनरलनेच दिला असला पाहिजे. कोण असावा तो जनरल? जनरल बी. एम. कौलच.

"नेहरूनंतर कोण?" या पुस्तकाचा लेखक जनरल कौलबद्दल लिहिताना म्हणतो, "१९४२ मध्ये भारताने लडाखमध्ये आणि उत्तर–पूर्व सरहद्दीवर स्वीकारलेल्या फॉरवर्ड पॉलिसीचा मूळ जनक जनरल कौल होता. जनरल कौलने नेहरूंचे मन वळवले व त्यांना आपली फॉरवर्ड पॉलिसी कशी योग्य आहे ते पटवून दिलं!"

भारतीय सेनेतल्या अनेक अधिकाऱ्यांना हे ठाऊक आहे की ही फॉरवर्ड पॉलिसी मुळात जनरल कौलची. कारण १९६१–६२ मध्ये पॉलिसी ठरवण्याच्या बाबतीत जनरल थापरना फारसे महत्व दिले जात नव्हते. एवढेच कशाला? या बाबतीत ज. कौलने स्वतःच कबुलीजबाब दिला आहे. आपल्या 'अनटोल्ड स्टोरी' या पुस्तकात जनरल कौल लिहितात.

"मी फेब्रुवारी १९६२ मध्ये गौहत्तीला गेलो आणि नेफामध्ये संरक्षणाच्या दृष्टीनं काय करता येईल याचा विचार करण्यासाठी तिथल्या वरिष्ठ मुलकी आणि लष्करी अधिकाऱ्यांची एक सभा बोलावली. मी त्यांना त्या सभेत सांगितलं की सरहद्दीवर वादग्रस्त टापूत पुढं जाऊन आपण चौक्या बांधणं अत्यंत आवश्यक आहे.

कारण, आपण जर अशा चौक्या बांधल्या नाहीत तर त्या ठिकाणी चिनी आपल्या अगोदर चौक्या बांधतील. माझ्या या सूचनेला लेफ्टनंट जनरल के. उमरावसिंग यांनी विरोध केला. काही वेळ चर्चा झाली आणि शेवटी तिथे हजर असलेल्या सर्व अधिकाऱ्यांनी असं ठरवलं की अडचणी काहीही येवोत, देशाच्या हिताच्या दृष्टीनं विचार करता सरहद्दीवर जास्तीत जास्त चौक्या उभारल्याच पाहिजेत."

जनरल कौल यांच्या या गौहत्ती येथील भेटीच्या आणि सभेच्या संदर्भात काही गंभीर प्रश्न उपस्थित होतात की, जे आजपर्यंत कुणीच जनरल कौलना विचारले नाहीत.कारण 'अनटोल्ड स्टोरी'च्या वाचकांना लष्करातल्या शिस्तबद्ध आणि आतल्या कार्यपद्धतीची माहिती नव्हती. पहिला गंभीर प्रश्न असा की देशाची संरक्षणविषयक पॉलिसी ठरवणे हे काम कॅबिनेटमधल्या डिफेन्स कमेटीचे असते. फक्त डिफेन्स कमिटीचाच तो अधिकार जनरल कौलना कुणी दिला? जनरल कौलना 'पॉलिसी' ठरवण्याचा काय अधिकार? दुसरा गंभीर प्रश्न असा की जनरल बी. एम् कौल त्या वेळी CGS होते. (Chief of the General Staff) आणि देशाच्या संरक्षणाची पॉलिसी ठरवत असताना कमांड हेड क्वार्टर्सबरोबर सल्लामसलत न करताच, Command HQला डावलून, संरक्षणविषयक धोरण ठरवण्याचा त्यांना काय अधिकार होता? खरी गोष्ट अशी आहे की ज्या फॉरवर्ड पॉलिसीची जबाबदारी जनरल कौलवरच पडते ती टाळण्यासाठी त्यांनी स्वर्गीय पंडित नेहरूंना त्या पॉलिसीबाबत जबाबदार धरले. कारण त्या फॉरवर्ड पॉलिसीचा चीनने फज्जा उडवला. त्या फजितवाड्याची जबाबदारी माझ्यावरच पडते असे सांगण्याचे नैतिक धैर्य जनरल कौल यांच्या ठिकाणी नाही. जनरल कौल 'अनटोल्ड स्टोरी' या त्यांच्या पुस्तकात पुढे लिहितात, "याच फॉरवर्ड पॉलिसीचा पाठपुरावा करण्यासाठी आपल्या आसाम रायफल्सच्या तुकड्या नेफामध्ये घुसल्या. यांपैकी एका तुकडीचे नेतृत्व करीत होते कॅप्टन महावीर प्रसाद. त्यांनी नेफामधील धोला या ठिकाणी संरक्षक चौकी बांधण्याचा प्रयत्न केला."

प्रयत्न केला? प्रयत्न हा जनरल कौल यांचा शब्द दिशाभूल करणारा आहे. नुसते शब्दांचे अवडंबर माजवून पाल्हाळ लावू नका जनरल कौल! मूलभूत प्रश्न असा उपस्थित होतो की धोला हे ठिकाण चौकी बांधण्यासाठी कुणी निवडले? कुणी हुकूम दिला कॅप्टन महावीर प्रसादना धोला या ठिकाणी चौकी बांधा म्हणून?

फॉरवर्ड पॉलिसीची कल्पना मुळात पंडित जवाहरलाल नेहरूंची होती हे जनरल कौल यांचे म्हणणे वादापुरते खरे मानले तरीदेखील काय हुकूम होता पंतप्रधान पंडित नेहरूंचा? पंतप्रधानांचा हुकूम हा होता की, जी ठिकाणे आपली आहेत अशी आपली खात्री आहे तिथेच चौक्या बांधा. (In what we were Convinced was our territory) मग धोला हे ठिकाण आपले आहे अशी आपली खात्री होती का? कोण जबाबदार आहे पंतप्रधानांच्या हुकमाचा भंग

करण्यात ? जनरल कौल पुढे म्हणतात की " फॉरवर्ड पॉलिसीची अंमलबजावणी करताना इंटेलिजन्स ब्युरोचे श्री. बी. एन्. मलिक व श्री. हूजा या अधिकाऱ्यांनी मला पुरेशी माहिती आणि आवश्यक ते सहकार्य दिले नाही ! " अस्सं ! या भयानक आणि मन खिन्न करून टाकणाऱ्या वादात आता इंटेलिजन्स ब्यूरोला-देखील ओढता का ? मग द्या जबाब जनरल कौल, की धोला या ठिकाणी चौकी उभारण्याचा सल्ला आणि धोलाबद्दल पुरेशी माहिती (!) तुम्हांल इंटेलिजन्स ब्यूरोच्या श्री. बी. एन् मलिक आणि श्री. हूजा या अधिकाऱ्यांनीच पुरविली होती ? या बाबतीत तुम्ही मिनिस्ट्री ऑफ एक्स्टर्नल अ‍ॅफेअर्सशी सल्ला-मसलत केली होतीत ? का सरहद्दीवर ज्या ज्या ठिकाणी चौक्या उभारायच्या होत्या त्या ठिकाणांची यादी तुम्ही स्वतःच कमांड हेड क्वार्टर्स (Command HQ) ला दिलीत ? का ती यादी फेब्रुवारी १९६२ मध्ये गौहत्ती येथे झालेल्या आणि उपस्थित सर्व लष्करी अधिकाऱ्यांनी मान्यता दिलेल्या सभेत ठरली होती ? कदाचित इतक्या लवकर चिनी घुसलेदेखील नसते. धोला या ठिकाणी वादग्रस्त टापूत चौकी उभारल्याबरोबर चिन्यांचा भडका उडाला. त्यांना निमित्त सापडले आणि भारतावर त्यांनी हल्ला चढविला. जनरल कौल हे सीनियर जनरल होते आणि म्हणूनच आश्चर्य वाटते की त्यांना आपले स्वतःचे समर्थन करताना अनेकदा अर्धवट अर्थाचे शब्द का वापरावे लागले ? जनरल कौल लिहितात, "It was agreed by all present that it was imperative in the national interests of defence to establish as many posts along our border in NEFA as possible, despite our difficulties." डिस्पाइट अवर डिफिकल्टीज ? म्हणजे काय ? जनरल थोरात हेच सांगत होते ना ? की एकदम पुढे जाऊन चौक्या उभारू नका. ते डिफिकल्ट आहे ! आणि असे असून आपल्या ' अनटोल्ड ' स्टोरी या पुस्तकात जनरल कौलने जनरल थोरातांची थोरवी कमी करण्याचा शक्य तितका प्रयत्न केला आहे आणि तोदेखील अर्धवट भाषेत. अगदी स्पष्ट सांगायचे तर जनरल कौल गौहत्तीला गेले होते ते फॉरवर्ड पॉलिसीला विरोध करणाऱ्या आर्मी ऑफिसर्सना दरडावण्यासाठी. कारण कॉर्पस् कमांडरपासून तो माझ्यासारख्या ब्रिगेड कमांडरपर्यंत सर्वांचा फॉरवर्ड पॉलिसीला विरोध होता. जुलै १९६२ मध्ये जनरल कौलनी सरहद्दीला भेट दिली. कशासाठी ? फॉरवर्ड पॉलिसीचा पाठपुरावा करण्यासाठी. त्या वेळी त्यांनी राजकीय नेत्याच्या थाटात एक भाषण ठोकले आणि उपस्थित ' ऑफिसर्स 'ना बजावले की, " भारतीय सेनेत २ वर्ग आहेत. (या पूर्वी असे २ वर्ग कधी नव्हते !) एक ' आहे रे ' वादी आणि दुसरा ' नाही रे ' वादी. (Who can and some who can't) जे पुढे जाऊन फॉरवर्ड पॉलिसी अंमलात आणू शकत नाहीत ते पराभूत मनोवृत्तीचे ' नाही रे ' वादी आहेत. त्यांची गय केली जाणार नाही हे बजावून ठेवतो. " उपस्थित थोरात-

वादी आर्मी ऑफिसर्सनी एकमेकांकडे फक्त पाहिले. काय बोलणार ? जनरलच जर का मिनिस्टरसारखे बोलायला लागला (!) तर देशाचे वाटोळे होणार नाही तर दुसरे काय होणार ? त्या वेळी फॉरवर्ड पॉलिसी अंमलात अणण्याचा एक भाग म्हणून एका महत्त्वाच्या कॉनफरन्ससाठी मी तावांगहून तेझपूरला जात होतो. (कारण नाहीतर माझी गय केली जाणार नव्हती !) वाटेतच ३ जुलै १९६२ ला FSOI वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्याने मला थांबवले आणि बजावले की बोमदिलाच्या पुढे मी जी लष्करी हालचाल करीन त्याची जबाबदारी व्यक्तिश: माझ्यावर राहील. (I was told that I would be personally responsible for organising the move to a certain forward post) साहेब पुढे म्हणाले की, " आता उशीर करून वेळ काढू नकोस. पुढे जा ! कारण जनरल कौल भयंकर संतापलेले आहेत आणि पुढे जायला तुम्हांला का उशीर झाला या बाबतीत ते काहीही ऐकून घेणार नाहीत." (I was further told to hurry the move as General Kaul was furious at the delay and would not accept any excuses) ब्रिगेड कमांडर या नात्याने मी गोंधळून गेलो. माझी बोबडी वळली. पुढे गेलो तर जबाबदार व्यक्तिश: मी आणि पुढे जायला उशीर झाला तर जनरल कौल माझी बिलकुल गय करणार नाहीत ! इकडे आड, आणि तिकडे विहीर. लढाई सुरू होण्यापूर्वी ब्रिगेड कमांडरच या मन:स्थितीत ! स्टेटसमनच्या नोव्हेंबर १९६७ च्या विशेषांकात स्टेटसमनचा सैनिकी वार्ताहर म्हणतो,

" जनरल थापर आणि जनरल कौल हे फॉरवर्ड पॉलिसीची जबाबदारी टाळू शकणार नाहीत. कारण हे दोन्ही जनरल्स जरी सरकारला वेळोवेळी विनवून सांगत होते की, फॉरवर्ड पॉलिसीच्या अंमलबजावणीत 'अडचणी' आहेत तरी असे मात्र म्हणत नव्हते की, या अडचणीच अशा आहेत की, त्यामुळे फॉरवर्ड पॉलिसी अंमलात आणणे केवळ धोक्याचेच नव्हे तर ते अशक्यच आहे. ही फॉरवर्ड पॉलिसी चुकीची आहे." स्टेटसमन् पुढे म्हणतो, " ज्या पॉलिसीमुळे देश धोक्यात येऊ शकेल त्या पॉलिसीविरुद्ध जनरलने ठामपणे उभे राहिले पाहिजे. जनतेला वेळीच जागृत करण्यासाठी वेळप्रसंगी राजीनामा दिला पाहिजे. कारण सरकारचा हुकूम पाळणे हे सोल्जरचं जसं कर्तव्य आहे तसंच वेळप्रसंगी 'सरकारचा हुकूम मी पाळणार नाही कारण तो देशविघातक आहे," असं स्पष्ट सांगून तो चुकीचा हुकूम धुडकावून देणं हेदेखील सोल्जरचं कर्तव्य आहे. कारण सरकार टेंपररी (!) असतं. राष्ट्र मात्र पर्मनंट असतं." जनरल कौल हा त्या दर्जाचा 'सोल्जर' नव्हता. देशाच्या हितासाठी भारत सरकारविरुद्ध ठाम भूमिका घेऊन " हा तुमचा हुकम मी पाळणार नाही, कारण तो लष्करीदृष्टया चुकीचा आहे, देशाचं अनहित करणारा आहे," असे सरकारला ठणकावून सांगणाऱ्या जनरल थिमय्या आणि जनरल थोरात यांची रुंद छाती जनरल कौलला लाभलेली नव्हती. फॉरवर्ड पॉलिसी अंमलात आणण्यात

'डिफिकल्टीज' आहेत, असे एकीकडे साळसूदपणे म्हणत जनरल कौल माझ्यासारख्या ब्रिगेडियरसकट सर्व लष्करी अधिकाऱ्यांना दमदाटी करीत होता की, "लवकर पुढे जा. उशीर केलात तर तुमची गय करणार नाही."

...आणि त्याच वेळी भारतीय सेनेत अनुभवी, खऱ्या अर्थाने सोल्जर असलेले, शहाणे जनरल्स होते. त्यांची उपेक्षा आणि हेटाळणी भारत सरकारने चालवली होती. जाणूनबुजून आणि हेतुपुरःसर त्यांना उद्देशून 'पश्चिमी राष्ट्रांचे हस्तक', 'सैन्यात उगाच घबराट माजवणारे' अशा 'पदव्या' देण्यात येत होत्या. जनरल थोरात पश्चिमी राष्ट्रांचे हस्तक होते? (Pro-West) जनरल थोरात सैन्यात घबराट माजवणारे होते? (Alarmist and over-Cautions!) अरे, कुठे फेडाल ही पापे! वस्तुतः जनरल थिमय्या यांच्या सेवानिवृत्तीनंतर सरसेनापतीपदावर हक्क होता तो जनरल थोरातांचा. पण त्यांना डावलून सरसेनापतिपदावर एप्रिल १९६१ मध्ये नेमणूक झाली ती जनरल थापर यांची. का? कारण, जनरल थोरात फॉरवर्ड पॉलिसी ऐकणार नाहीत, एवढेच नव्हे तर त्या बाबतीत ते कुणाचीही पर्वा करणार नाहीत अशी भारत सरकारची खात्री होती म्हणून! एवढ्यावरच भागले? जनरल थोरातांना पाठिंबा देणारे लष्करी अधिकारी कोण कोण आहेत, याची 'काळी यादी (!)'च सरकारकडे असावी. जनरल एस्. डी. वर्मा हे जनरल थोरातांना पाठिंबा देतात म्हणून की काय, त्यांना भारत सरकारने प्रमोशन दिले नाही. जनरल वर्मांची सिनिऑरिटी डावलून भलत्याच माणसाला वरची जागा दिली गेली. कल्पना करा की, तुम्ही कारकून आहात आणि तुमच्या हाताखालच्या शिपायाला जर का एकदम हेड ऑफ द डिपार्टमेंट केला गेला तर तुमची मनःस्थिती काय होईल? भारतीय सेनेच्या इतिहासात प्रथमच हे प्रकार सुरू झाले होते. जनरल एस्. डी. वर्मांना असह्य मनःस्ताप झाला. त्यांनी राजीनामा दिला आणि भारतीय सेनेतून ते बाहेर पडले. एक लायक जनरल राजीनामा देतो या प्रकाराची खंत, खेद, लाजलज्जा किंवा शरम त्या वेळी कुणालाही वाटली नाही. उलट भारत सरकारने निःश्वास टाकला! जनरल थिमय्या आणि जनरल थोरात पेन्शनीत गेले. ते दोघे 'तसे' गेले हा 'असा' गेला. आता फॉरवर्ड पॉलिसीचा मार्ग मोकळा झाला. या फॉरवर्ड पॉलिसीचा फायदादेखील चिनी सरकारने प्रचारासाठी उठवला. भारत सरकारला वाटत होते की, चीन आक्रमण करणार नाही. लढाई अशी होणारच नाही. आपण सरहद्दीवर चौक्या बांधू. चीन पण बांधील. शाब्दिक चकमकी फार फार तर होतील. गंमतच आहे! या पॉलिसीला भारत सरकार म्हणत होते ग्रँड स्ट्रॅटेजी! १९६२ मध्ये पंडित नेहरूंनी लोकसभेत सांगितले की, "सरहद्दीवर एकूण ४३ स्ट्राँग पॉईंटस् चिन्यांना रोखण्यासाठी आपण निर्माण केलेले आहेत." लष्करीदृष्ट्या ते स्ट्राँग पॉईंटस नव्हते. त्यांना फार फार तर फ्लॅग पोस्टस (Flag Posts) म्हणता आले असते.


# फॉस्फोमिन -

## अधिक उत्साह देते. भूक वाढविते. जोम वृद्धिंगत करते. शरीराची रोग-प्रतिकार-क्षमता वाढविते.





खरोखर!...
फॉस्फोमिन म्हणजे
घरकुलांतील
आरोग्याचे कारंजे!




व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्स आणि विविध ग्लिसरोफॉस्फेटस्‌युक्त उत्तम फलास्वाद असलेले हिरव्या रंगाचे टॉनिक—फॉस्फोमिन

SQUIBB

® हा ई. आर. स्क्विब अँण्ड सन्स इन्कॉर्पोरेटेड यांचा रजिस्टर्ड ट्रेडमार्क आहे व करमचन्द प्रेमचन्द प्रायव्हेट लि. यांना तो वापरण्याचे लायसन्स आहे

SARABHAI CHEMICALS

Shilpi SC 50A/67 Mar

हे चीन सरकारलादेखील ठाऊक होते. तरीदेखील चिनी सरकारने कांगावा केला आणि We had bulit 42 strong points as evidence of our intention to launch an attack against China" या पंडित नेहरूंच्या वाक्याचा फायदा उठवला. साधी भोळी माणसे सरळ अर्थाने बोलून जातात आणि बदमाश माणसे मुद्दाम वाकडा अर्थ काढतात. १९६२ मध्ये भारतीय सेनेला बेदम ठोकून काढल्यानंतर—नंतर आधी नव्हे—चीनने सगळ्या जगात आरडाओरड केली की, "चीनने भारतावर आक्रमण केलेले नाही. उलट भारतच चीनवर आक्रमण करीत होता!" कशावरून? पाहा! पाहा! भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूच असे म्हणाले होते की, "We had built 42 strong points." कशासाठी? "as evidence of our intention to launch an attack against China!"

...राजकीय बदमाशी म्हणून हा प्रचार कसाही असो, चीन सरकारला आणि चिनी लष्करी अधिकाऱ्यांना हे ठाऊक होते की, 'ही कसली भारताची अजब फॉरवर्ड पॉलिसी? कसले बोडक्याचे स्ट्रॉंग पॉईंटस? वरून हुकूम आला की, तासादोन तासांत भारताचे 'स्ट्रॉंग पॉईंटस' उडवून देऊ!"

आणि अखेर ज्या हुकमाची चिनी लष्करी अधिकारी वाट पाहत होते तो हुकूम पंतप्रधान चाऊ-एन्-लायने दिला! अगदी तिबेटइतकाच केविलवाणा आकांत करून भारत सरकार कळवळून २० ऑक्टोबर १९६२ ला ओरडले, "मेलो! मेलो! वाचवा!"

(क्रमशः)

**By arrangement with THACKER & CO. LTD.
from their forthcoming publication,
" HIMALAYAN BLUNDER " by Brig. J. P. Dalvi.
© with the original publisher.**

# तुमचे भविष्य
# आमचा अंदाज

## दि. १९ ते २५ एप्रिलचे राशिभविष्य

### श्री. गो. जोशी, सायनाचार्य

**मेष** : रवि–शनीचे तुमच्या राशीतून संचलन सुरू झालेले आहे. ते थोडेफार अस्वास्थ्य वाढवीलही, पण चुकूनही अपयशाचा डाग लागू देणार नाहीत. उलट या वेळी आपण प्रयत्नांची शिकस्त केलीच तर अनन्यसाधारण यश मिळवून दाखवाल.

यांत्रिक–तांत्रिक क्षेत्रांतील व्यक्तींना हा काळ कधी नव्हते एवढे यश देऊन जाईल. अनिष्ट कालातही परिस्थितीवर मात कशी करता येते याचे प्रात्यक्षिक तुमच्या कृतीने जगाला दिसेल.

या वेळी प्रकृतीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. उष्णविकार वाढू लागतील.

दि. २०–२३ हा काल विशेष अनुकूल आहे.

**वृषभ** : नित्याचे तंत्र बदलल्याशिवाय निभाव लागणार नाही, अशी जाणीव क्षणोक्षणी व्हायला लागेल.

शनी–मंगळ हात धुवून तुमच्या पाठीशी लागलेले आहेत. त्यांना रोखणे तितकेसे सोपे नाही. वेळप्रसंगी माघार घेऊन, जुळते मिळते घेऊन वागावे लागेल.

भागीदारीचे व्यवहार कोणत्याही क्षणी चिघळतील, सांपत्तिक ताण असह्य वाटू लागेल. व्यवहार क्षेत्रात संघर्षांच्या ठिणग्या उडू लागतील. असे असूनही याही अनिष्ट कालातून आपण यशस्वीपणे बाहेर पडू शकाल. अवास्तव खर्चाला आळा घालण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करा.

दि. २२ ते २४ काहीसा अनुकूल काल.

**मिथुन** : सूर्य–मंगळ हवे तसे आहेत. ते तुमच्या साऱ्या विवंचना मिटवू शकतील. आता तुमचा प्रगतीचा मार्ग सहसा कोणीच रोखू शकणार नाही. दैविक कृपेचा प्रत्यय पदोपदी येईल. धनिकांचे सहकार्य कोणत्याही क्षणी लाभेल. तुमच्या आजवरच्या साऱ्या स्थगित योजनांना गती मिळू लागेल. भंगलेल्या अपेक्षा सांधल्या जातील.

चौथ्या गुरूची प्रकर्षाने दखल घ्यायची गरजच भासणार नाही. स्थानांतर, राहत्या जागेत सोयीस्कर बदल, नव्या कार्यक्षेत्रात पदार्पण अशा गोष्टी या काली घडून येण्याची शक्यता फार मोठी आहे.

दि. २२ ते २५ विशेष अनुकूल काल.

**कर्क** : गुरू–मंगळ–सूर्य आदी अनेक ग्रह तुमच्या पाठीशी उभे आहेत, ते सहसा कोणत्याही गोष्टींची तुम्हांला उणीव भासू देणार नाहीत.

व्यवसायधंद्यात अनेक नव्या योजना याच आठवड्यापासून आखल्या जातील. सांपत्तिक लाभ होईलच. त्याहीपेक्षा प्रतिष्ठा अधिक लाभेल.

नव्या जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागतील, आणि त्या यशस्वीपणे पार पाडून दाखवण्यासाठी थोरांचे सहकार्यही लाभेल.

गेल्या कित्येक महिन्यांत लाभला नसेल इतका हा सर्वांगाने अनुकूल काल तुम्हांला अनुभवण्यास मिळेल. कला–साहित्य–क्रीडा या क्षेत्रांत विक्रमी यश लाभेल सांसारिक मंगल कार्ये निर्विघ्नपणे पार पडतील.

दि. १९ ते २१ विशेष लाभाचा काल.

**सिंह** : तुम्हा सिंहराशी व्यक्तींचे उपास्य दैवत सूर्य. तेच भाग्यात प्रकटले आहे. तुम्हांला आता चौथ्या मंगळाची धास्ती बाळगण्याचे कारण नाही. या महिन्यात तुमचे अनेक प्रश्न भराभर सुटायला लागतील. मंगल कार्याचे ठरेल, व्यवहार-धंद्यातील पेचप्रसंग सुटतील, कोर्ट–कचेरीची कामे अपेक्षेप्रमाणे यशस्वी ठरू लागतील.

या आठवड्यात दूरचा प्रवास घडेल आणि त्या प्रवासामुळेच तुमच्या प्रगतीला उत्थान मिळेल.

व्यापारधंद्यांत–नोकरीचाकरीत प्रतिष्ठेचे स्थान लाभेल. अनपेक्षित स्वरूपाचा धनलाभही होणे अशक्य नाही.

दि. २१ ते २४ या कालाची प्रामुख्याने नोंद करा.

**कन्या** : सूर्य–शनींचे भ्रमण अष्टमातून सुरू आहे म्हणून माघार घेऊ नका. मंगळ पराक्रमात. एवढे एकही सामर्थ्य तुमच्या मार्गातील साऱ्या अडचणी झाडून काढायला पुरेसे आहे.

गुरूचे अनन्यसाधारण सामर्थ्य याच आठवड्यापासून आपल्या प्रत्ययास यायला लागेल. सामाजिक दर्जा सुधारेल, राजकीय क्षेत्रात मान्यता वाढेल. हाती घेतलेली सारी कामे अपेक्षेबाहेर यश घेऊन उठतील.

दूरच्या प्रवासाचे लांबणीवर टाका. खर्चाचे मान फारसे वाढू नये म्हणून दक्ष राहा.

यांत्रिक–परराष्ट्रीय व्यवहार लाभदायक ठरतील.

दि. २४–२५ पासून सर्वत्र आशादायक वातावरण दिसू लागेल.

**तूळ :** रवि–शनीचा विरोध सुरू असतानाच मंगळाचीही सहानुभूती आपण गमावून बसला आहात. ही स्थिती काही स्वास्थ्याची व अपेक्षित यश देणारी नाही म्हणूनच या वेळी आपण प्रत्येक पाऊल मोजून मापूनच टाकायला हवे.

व्यापार धंद्यात साहस करण्यास हा काल मुळीच अनुकूल नाही. व्यवसाय धंद्यात सतत सावधगिरी बाळगायला हवी. इष्ट मित्रांवर विसंबून राहण्यात मुळीच अर्थ नाही.

दंत–नेत्र विकार वाढू लागतील. सांपत्तिक पेच प्रसंगी वाढू लागतील, वाहन कोणत्याही क्षणी दगा देईल, स्थावराचा प्रश्न सोडविणे अवघड जाईल.

दि. २२ ते २५ या कालात काही अनुकूल गोष्टी घडतील.

**वृश्चिक :** सध्या तरी निदान सर्वच आघाड्यांवर दिसणारी माणसे वृश्चिक राशीचीच असावीत असे अनुमान करणे चुकीचे ठरू नये.

गेल्या आठवड्यापासूनच आपली प्रगतीकडे घोडदौड सुरू आहे. या वेळी त्याचा वेग अधिकच वाढेल. अनपेक्षित स्वरूपाचे धनलाभही होणे शक्य आहे.

नोकरीधंद्यात प्रतिष्ठा खूपच उंचावेल, साहित्य कला क्षेत्रात तर तुम्हांला कोणी प्रतिस्पर्धीच उरणार नाही.

स्थावराचा प्रश्न अपेक्षेप्रमाणे सुटेल. वाहन घेण्याचे विचार आकार घेऊ लागतील. नवा धंदा उभारण्याचे निश्चित ठरेल.

दि. २३ ते २५ हा काल नोंद करण्यासारखा आहे.

**धनू :** चौथा राहू आणि बारावा मंगळ, या अनिष्ट ग्रहांनी अगदी उच्छाद मांडला आहे. हाती पैसा टिकत नाही, आणि कोणतेही काम मनाप्रमाणे घडून येत नाही. काही दिवस जपून वागणे हाच एक त्यावर उपाय.

सूर्य–गुरूंची थोडीफार सहानुभूती लाभत असल्यामुळे, तुमची प्रतिष्ठा धोक्यात येणार नाही.

व्यवसायधंद्यांत अडचणी वाढ लागतील, विरोधकांची कारस्थाने जाणवायला लागतील. वरिष्ठांचा जाच, स्थावराच्या कटकटी, इत्यादी प्रकारांनी मन अस्वस्थ बनेल. याही परिस्थितीत आपण आपले स्थान टिकवू शकाल.

वाढत्या खर्चाच्या योजना आखू नका.

दि. २० ते २२ थोडेफार अनुकूल दिवस.

**मकर :** गुरू–मंगळांची आत्यंतिक अनुकूलता असताना रवि–शनी तुमच्या मार्गात येण्याचे मुळीच धाडस करणार नाहीत. या आठवड्यापासून आपल्या प्रग-

तीचा वेग आणखी वाढेल. अनेक कामे हातावेगळी केली जातील. नवे स्नेहसंबंध जोडले जातील, धनोत्पादनाचे नवे मार्ग दृष्टिक्षेपात येतील.

तुमच्या जीवनातील हा एक महान पर्वकाल आहे. नोकरीधंद्यातील स्थान उंचावेल, काल-साहित्याच्या क्षेत्रात मान सन्मान लाभेल, राजकीय क्षेत्रातही तुमचा आवाज उठेल.

दि. २२ ते २४ विशेष लक्षात ठेवण्यासारखा अनुकूल काल.

**कुंभ :** मंगळ दशमात, सूर्य-शनी पराक्रमांत. कर्तृत्वसंपन्न ग्रह हवे तसे आहेत. आता आपणांस अशक्य, अवघड असे काहीच जाणवणार नाही. जाल त्या क्षेत्रात आवाज उठवाल. मुख्यत: शिक्षण, अर्थशास्त्र, संशोधन या बाबतींत तुमचे महत्त्व खूपच वाढेल.

दूरचा प्रवास घडेल, नोकरीत अधिकाराचे स्थान लाभेल, अपेक्षा बऱ्याच प्रमाणांत सफल होतील. सामाजिक-राजकीय क्षेत्रातही तुमच्या उपस्थितीची नितांत गरज भासेल.

साडेसाती मागेच संपलेली असल्यामुळे तुमचे जीवन आता वेगाने प्रगतीकडे वाटचाल करू लागेल.

दि. २३ ते २५ विशेष अनुकूल काल.

**मीन :** आपणांस सध्यातरी कोणत्यांही ग्रहांची डर नाही. उलट ते तुम्हांला हवे ते द्यायला उद्युक्त आहेत.

भाग्यातील मंगळामुळे आगामी २-३ महिन्यात आपणांस सारखा प्रवास करावा लागेल. आणि त्या प्रवासामुळेच तुमची प्रगती अधिक वाढेल. नवे क्षेत्र हस्तगत होईल, प्रगतीच्या नव्या वाटा दृष्टिक्षेपात येतील.

कला, वृत्तपत्रीय व्यवसाय, नभोवाणी इत्यादी क्षेत्रांत नेत्रदीपक कार्य करून दाखवण्याची संधी लाभेल. नवे मित्र जोडले जातील, थोरांच्या सहानुभूतीने अशक्य कामेही शक्य करू शकाल.


वैचारिक संघर्ष मिटेल, प्रकृतिमान सुधारेल. हाती पैसाही येत राहील.

दि. २३ ते २५ हा काल अपेक्षासाफल्याचा जाणवेल.

O

# पैशाला पाय फुटण्यापूर्वीच महाराष्ट्र बँकेत नियमाने बचत करा






## चैन चंगळ हवीच पण भविष्याची तरतूद करणारी बचत त्या अगोदर हवी

आपण खालील पद्धतीने बचत करू शकतां.

(१) रीकरिंग डिपॉझिट योजनेद्वारां (आवर्तक योजना) (२) मुदत ठेव योजनेद्वारां (फिक्स्ड डिपॉझिट)

(३) सेव्हिंग्ज खाते उघडून

सविस्तर माहितीसाठी आपल्या जवळच्या शाखाधिकाऱ्याला भेटा

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

रजिस्टर्ड ऑफीस: ११७७, बुधवार पेठ, पुणे-२

# चित्रपट

## जानकी

हेमा ही इन्स्पेक्टर देशपांडे यांची एकुलती एक कन्या. इन्स्पेक्टरसाहेबांच्या घरासमोर निरंजन नावाचा चित्रकार राहत असतो. अपेक्षेप्रमाणे तो होतकरू, तरुण, सुंदर, भोळाभाबडा वगैरे असतो. हेमा-निरंजनचा स्नेह वाढू लागतो. त्यात निरंजन हेमाला सर्पदंशापासून वाचवतो. म्हणजे प्रेमाची गाडी सरकत सरकत बोहल्याच्या प्लॅटफॉर्मपर्यन्त येते. आणि इन्स्पेक्टरसाहेब हेमासाठी स्थळ आणतात. हेमा अस्वस्थ होते. आपल्यापासून दूर असलेल्या निरंजनला अनेक पत्रे लिहिते. निरंजनच्या आईची तब्येत बिघडल्याने तो आपल्या आईसह हॉस्पिटलमध्ये जातो हेमाने पाठविलेली पत्रे मिळू शकत नाहीत. वाट पाहून कंटाळलेली हेमा वडिलांनी आणलेल्या मुलाच्या गळ्यात माळ घालते. नवीन संसारामध्ये तिचा जीव रमू लागतो न लागतो तोच वेडा निरंजन पुन्हा येतो. या वेड्याला शहाणा करण्यासाठी हेमा ऐन मध्यरात्री घर सोडते. स्मृतिभ्रंश झालेल्या निरंजनला ताळ्यावर आणण्यासाठी पुन्हा सर्पदंशाचा प्रसंग. निरंजन शहाणा होतो. पण हेमाला सासरचे दार कायमचे बंद होते. हेमा तडक रेल्वे लाईनवर जाते. एकच धावाधाव. पण उपयोग नाही. आपल्या छोट्या भाचीला वाचवताना हेमा जबरदस्त जखमी होते. ,सर्व अपेक्षित मंडळी भोवती जमा होतात. निरंजन हेमाच्या पावित्र्याची ग्वाही देतो. सर्व मंडळींचे शंकानिरसन होते. आणि जखमी झालेली हेमा कायमचे डोळे मिटते.


'सुरेख चित्र' या बॅनरखाली तयार झालेल्या 'जानकी' या चित्रपटाची ही कथा.

योगायोगावर आधारलेले कृत्रिम प्रसंग, गलिच्छ उपकथानक, कथासूत्र सोडून धावणारी पटकथा, यामुळे चित्रपट केवळ सामान्यच नव्हे तर कंटाळवाणा झाला

आहे. पटकथेतील काही दोषांची दखल घेणे आवश्यक वाटते. हेमा-निरंजनचे प्रेम आहे. त्यांच्या विवाहाला निरंजनच्या आईची संमती आहे. हेमाची आईही निरंजनची भेट घेण्यास तयार आहे. अशा परिस्थितीत केवळ " पत्रांना उत्तर आले नाही " या सबबीवर हेमा लग्नाला तयार कशी होते, हे समजू शकत नाही. विजू आणि त्याच्या प्रेम प्रकरणांची दखल अनावश्यक आहे. त्यातही नीलम व गुलाब यांची हाणामारी तर विलक्षण ओंगळ आहे. याच शब्दांत विजू व गुलाबच्या गाण्याचे वर्णन करावे लागेल. कोर्टातील खटल्याचे स्वरूप मूळ कथानकाला काहीसे पूरक असले तरी त्याचे चित्रीकरण हास्यास्पद आहे. सर्पदंशाचा " डबल डोस " विचित्र वाटतो. हेमा व मधुमती यांची नृत्य-जुगलबंदी सामान्य व " अमराठी " आहे. कलाकारांपैकी त्यातल्या त्यात बरा वाटतो सुधीर कुमार. जीवनकला प्रमुख भूमिकेला अजून न्याय देऊ शकत नाही. वनमाला, दादा साळवी, विजू खोटे यांनीही चित्रपटामध्ये कामे केली आहेत. चित्रपटाची तांत्रिक बाजू सामान्य आहे. ' सेटस् 'ची कृत्रिमता भरपूर जाणवेल अशा पद्धतीने कॅमेऱ्याचा वापर केला आहे. राम कदम यांचे पार्श्वसंगीत हिन्दी चित्रपटांशी मिळते जुळते आहे. गाण्यांच्या चाली सामान्य आहेत.

' सुरेख चित्र ' या बॅनरखाली इतके दरिद्री चित्र निघावे हा एक विचित्र योग मानला पाहिजे.

– शरद गोखले



 [पृष्ठ १५ वरून]

करावा. अखिल महाराष्ट्रात महाराजांसंबंधी निश्चित माहिती असलेली हीच काय ती माणसे आहेत त्याला काय करावे ? महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील ना. झकेरिया वगळता बाकी तमाम मंत्री त्या दिवशी कुठेना कुठे शिवाजी राजांवर बोलल्या-शिवाय राहणार नाहीत. अजिबात माहिती नसताना बोलणारी मंडळी जमेस धरताही अखिल महाराष्ट्रात शिवजयंती साजरी करणाऱ्या बहुसंख्य मंडळींची तरीही वक्ता नाही, म्हणून पंचाईत होत असणारच !

हे सगळे चित्र असे असले तरी एकंदरीत विचार करता शिवजयंती उत्सवाची आखणी ही प्राप्त राजकीय परिस्थितीत एक कठीण समस्याच आहे. हा उत्सव साजरा करण्याची नितांत आवश्यकता आहेच का ?

रावण के राम, कार्तबीज के परशुराम
दिल्लीपति दिग्गज के सेर सिवराज है

— असे शिवाजी महाराजांचे वर्णन करणारा कवी भूषण शिवाजीराजांनी नेमके काय केले ते सांगताना लिहितो—

वेद राखे, विदित पुराण राखे
सारयुत रामनाम राख्यो अति रसना सुघर मे ।
हिंदुनकी चोटी राखी है, सिपाहिन की कांधेमे जनेऊ राख्यो
जाला राखी गरमे ।
राजनकी हद्द राखी, तेंधनल शिवराज ।
देव राखे देवलमें, स्वधर्म राख्यो घरमे ।।

तोबा तोबा ! वेद राखले, पुराणे राखली, रामनाम राखले, शेंडी राखली, जानवे राखले, गळ्यांतली तुळसीमाळा राखली, देवळांत देव राखला, घरांत धर्म-कुलाचार राखला !

यातले काहीही राज्यकर्त्यांनी राखण्याची आज गरज नाही असे आपले नक्की ठरलेले असताना, मंत्रीमहाशयांनी प्रत्येक शिवजयंतीला भाषणे करणे म्हणजे आम्हांला संमत असा काल आम्ही अजून निर्माण करू शकलो नाही, याची ती जाहीर कबुलीच नव्हे काय ? राजा कालस्य कारणम असतोना ?

एक 'प्रखर बुद्धिवादी' म्हणून आम्ही शिवजयंतीच्या नावाखाली होणाऱ्या सर्व समारंभांचा तीव्र निषेध करतो !

रावण के राम, कार्तवीज के परशुराम
प्रतिगामी सिवराज के — बुद्धिवादी सेर है ।।
बुद्धिवादीके नगारनकी धाक सुनीके ।
सिवाजीको छाती दरकति है ।।

# □ न्यूइसन्स अँड सन्स

राजस्थानचे मुख्यमंत्री मोहनलाल सुखाडिया हे मोठे तडफदार गृहस्थ आहेत. त्यांच्या मंत्रिमंडळांतील एक मंत्री अमृतलाल यादव यांच्याकडे खादी व ग्रामोद्योग हे खाते होते. त्या खात्यासाठी ज्या आर्थिक समस्या होत्या, त्या विधानसभेत मंजूर करणे म्हणजे केवढे कठीण! कारण 'खादी' व 'ग्रामोद्योग' यांसाठी अमाप पैसा खर्चावा लागतो. निष्पन्न मात्र फारसे काहीच होत नाही. आता असे महत्त्वाचे काम विधानसभेत चालू असताना हा यादव कुठे 'गुरे चारायला' गेला होता कुणास ठाऊक! या यादव पुत्राला आपल्या खात्यात फारसा रस वाटला नाही ही गोष्ट सुखाडियांच्या लक्षात आली. वस्तुत: जाड्याभरड्या खादीत कसला आला आहे रस आणि ग्रामोद्योगांत लक्ष घालून मंत्र्याला मिळायचे काय? पण सुखाडियांना या मंत्र्याच्या बेफिकिरीचा इतका राग आला की त्यांनी तावडतोब ही दोन्ही खाती अमृतलाल यादवांकडून काढून घेतल्याचे तिथल्या तिथे जाहीर केले. त्यांनी अमृतलाल यादवांना कठोर शिक्षा दिली–'या पुढे मंत्रिमंडळात तुम्ही राहाल, परंतु बिन खात्याचे मंत्री म्हणून.' मंत्र्याचा पगार तसा फारसा नसतो. महत्त्वाचा असतो तो अधिकार आणि मानमान्यता आणि मंत्रिपदाचे इतर बारीकसारीक उपयोग. या सर्व गोष्टी अबाधित ठेवणारी ही चतुर शिक्षा सुखाडियांनी अमृतलाल यादवांना दिली हे त्यांच्या राजकारणपटुतेला भूषणावहच आहे. कारण काम असते म्हणून मंत्री थोडेच नेमलेले असतात! मंत्री असल्यामुळे काहीतरी काम द्यावे लागते इतकेच. तेव्हा बिनखात्याचे मंत्री म्हणून अमृतलाल सुखाने राहतील यात मुळीच शंका नको. अमृतलाल यादवांची क्रियात्मक किंमत व लायकी शून्य असली तरी त्यांची 'अपशकूनक्षमता' फार मोठी आहे. आता मंत्रिमंडळाबाहेर पडले तर सुखाडियांची मोहनिद्रा संपुष्टात आणतील. ही त्यांची न्युईसन्सक्षमता लक्षात घेऊनच हे खादीधारी शुभांगं भगवान यादव, सुखाडियांच्या शेषासनावर आता राजस्थानात 'शांताकारम्' पडून राहतील. त्यांनी तसे राहणे आवश्यक आहे, कारण त्यामुळेच सुखाडियांचे सरकार स्थिर राहणार आहे. न्युइसन्स अँड सन्स कंपनीला नवे आर्थिक वर्ष भरभराटीचे जावो.

– ग्यानबा



MANOOS (Weekly) । 40 Paise । Regd. No. M H–649

लेनिनला नकोसा झालेला स्टॅलिन
स्टॅलिनच्या मूर्तिभंजनात धन्यता मानणारा ख्रुश्चेव्ह
ख्रुश्चेव्हला अज्ञातवासात ढकलणारे ब्रेझनेव्ह–कोसिजीन
प्रत्येकजण आपणच लेनिनचे सच्चे वारसदार आहोत
असे उच्चरवाने सांगत होते, सांगत आहेत.

लेनिनपंथाला लाभलेली ही दांडगी लोकप्रियता
लेनिनच्या अनन्यसाधारण कर्तृत्वाचाच पुरावा आहे.

अशा या लोकोत्तर पुरुषाच्या
जीवनकार्याचे समग्र दर्शन

# व्होल्गा जेव्हा लाल होते

वि. स. वाळिंबे
मूल्य : रुपये अठरा
राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे २.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी संगम प्रेस, प्रा. लि., १७–ब, कोथरूड, पुणे ४ येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर